




रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

आत्मदीपो भव।

# वार्षिक अहवाल

२०१७-२०१८




"एक देश, एक निवडणूक" या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार, (डावीकडून) रवी पोखरणा, रवींद्र साठे, रेखा महाजन, डॉ. विनय सहस्रबुद्धे, प्रा.व्ही.के.मल्होत्रा आणि अरविंद रेगे.




डिजिटल शाळा अभियान अंतर्गत राज्यस्तरीय प्रेरणा सभेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना राज्यपाल सी. विद्यासागर राव, (डावीकडून) रवींद्र साठे, डॉ. विनय सहस्रबुद्धे, विनोद तावडे, अरविंद रेगे आणि हर्षल विभांडिक.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शाह यांनी लिहिलेल्या **भारतीय जनता पार्टी राजकारणात कशासाठी?** या पुस्तिकेचे प्रकाशन करतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, (डावीकडून) योगेश गोगावले, गिरीष बापट, प्रा. अनिरुद्ध देशपांडे, डॉ. विनय सहस्रबुद्धे, प्रकाश जावडेकर, मुक्ता टिळक आणि दिलीप कांबळे.




**मुखपृष्ठ**

**छायाचित्र क्र. १**

आर्थिक जनतंत्र परिषदेच्या **उद्घाटन** प्रसंगी बोलताना भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद. सोबत (डावीकडून) मिलिंद कांबळे, प्रा. अनिरुद्ध देशपांडे, देवेंद्र फडणवीस, सविता कोविंद, सी. विद्यासागर राव.

**छायाचित्र क्र. २**

भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थान (आय. आय. डी. एल.) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना भूपृष्ठ वाहतूक व रस्ते आणि नौकायन मंत्री नितीन गडकरी.

# वार्षिक कार्य अहवाल (२०१७-१८)

## प्रास्ताविक :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीस २०१७-१८ या कालावधीत झालेल्या कार्यक्रमांचा अहवाल सादर करण्यास मनापासून आनंद होत आहे. बघता-बघता संस्थेच्या कार्यास यंदा ३६ वर्षे पूर्ण झाली. १९८२ साली मुंबईतील चंचल स्मृती, वडाळा येथील छोट्याशा कार्यालयात सुरू झालेली संस्था आता आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा आपले कार्यक्रम योजू लागली आहे, ही संस्थेच्या दृष्टीने उल्लेखनीय बाब! पण, हे केवळ एकाएकी घडले नाही तर, स्व. उत्तमराव पाटील, स्व. प्रमोद महाजन, स्व. वसंतराव पटवर्धन, स्व. गोपीनाथ मुंडे सारख्या दिग्गजांचे प्रबोधिनीस मिळत गेलेले नेतृत्व, प्रबोधिनीतील कार्यकर्ते-कर्मचाऱ्यांची मेहनत व परिश्रम, विनय सहस्रबुद्धे यांची कल्पक दृष्टी, प्रबोधिनीवर प्रेम करणाऱ्या हितचिंतकांचे सहकार्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपा पदाधिकाऱ्यांचे मिळालेले मार्गदर्शन, यामुळेच प्रबोधिनीत एक विकसित संस्थाजीवन उभे राहू शकले.

१९९० पासून सक्रिय झालेला कार्यक्रम विभाग, प्रबोधन व प्रशिक्षणास मिळालेली संशोधनाची जोड, इ.स. २००० साली केशव सृष्टी, उत्तन, भाईंदर येथे निर्माण झालेले प्रबोधिनीचे संकुल, २००६ साली संयुक्त राष्ट्र संघाकडून विशेष स्वयंसेवी संस्था म्हणून मिळालेला दर्जा हे प्रबोधिनीच्या विकासातील काही महत्त्वाचे टप्पे. प्रबोधिनीच्या कार्यक्रमांची विशेषता सांगायची तर नावीन्यपूर्णता, सृजनता व सहभागात्मक प्रशिक्षण यांचा समावेश आणि व्यावसायिकतेला माणुसकीचा स्पर्श या सूत्रांच्या आधारे प्रबोधिनी प्रत्येक वर्षी वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम योजत आली आहे. याच वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची शृंखला प्रबोधिनीने गेल्या वर्षीही सुरू ठेवली.

भारतीय लोकतांत्रिक नेतृत्व संस्थानाच्या माध्यमातून राजकारणात करिअर घडवू पाहणाऱ्या युवकांसाठी सुरू करण्यात आलेला ९ महिन्यांचा निवासी अभ्यासक्रम, एक देश-एक निवडणूक या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र, पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जन्मशताब्दी निमित्त दीनदयाळ कथा व निर्णय प्रक्रियेच्या केंद्रस्थानी स्त्री : वास्तव आणि भविष्य या विषयावरील परिसंवाद हे दोन कार्यक्रम, केंद्र व काही राज्य सरकारांसमवेत हाती घेण्यात आलेले कार्यक्रम, आर्थिक लोकशाही परिषदेच्या निमित्ताने भारताचे महामहिम राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची प्रेरणादायी भेट, तसेच रवींद्र साठे यांची प्रबोधिनीच्या महासंचालकपदी झालेली नियुक्ती या वर्षभरात घडलेल्या काही महत्त्वपूर्ण घटना!

## अहवाल वर्षातील कार्यक्रम : संख्यात्मक दृष्टिक्षेप

| कार्यक्रम | कार्यक्रमांची संख्या | सहभागी संख्या |
|---|---|---|
| विशेष कार्यक्रम | ०८ | १४२६ |
| प्रशिक्षण | ३९ | २४३७ |
| प्रबोधन | १९ | १५२१ |
| आय.आय.डी.एल. | ०२ | ३२ |
| कौशल्य विकास कार्यक्रम | १५ | ४४४ |
| आर. एम. पी. इंटरनॅशनल | ०१ | २२ |
| पुस्तक प्रकाशन | ०१ | ५०० |
| संशोधन | ०१ | १५ |
| अन्य | ०९ | ३६२ |
| **एकूण** | **९५** | **६७५९** |

# १
# विशेष कार्यक्रम

## १.१
## आर्थिक लोकशाही परिषद
### १४ जानेवारी २०१८

“नोकरी मिळत नाही म्हणून स्वयंरोजगार करावा लागतो, अशी अगतिकता न बाळगता नोकरीतील संधी भलेही सोडा, स्वतः रोजगार निर्माते बना, स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरू करून व्यवसायातील छोट्यामोठ्या संधींचा लाभ घेत नोकऱ्या मागणारे नव्हे, तर नोकऱ्या देणारे हात बना,” असा मंत्र भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी आर्थिक लोकशाही परिषदे निमित्त जमलेल्या २०० तरुण उद्योजकांना दिला. दि. १४ जानेवारी २०१८ रोजी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने आयोजित केलेल्या आर्थिक लोकशाही परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी राष्ट्रपती कोविंद बोलत होते. या वेळी राष्ट्रपतींच्या पत्नी सविता कोविंद, महाराष्ट्राचे राज्यपाल डॉ. सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री शिव प्रताप शुक्ला, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे अध्यक्ष अनिरूद्ध देशपांडे, प्रबोधिनीचे तसेच भाजपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे (डिक्की) अध्यक्ष मिलिंद कांबळे, नाबार्डचे अध्यक्ष हर्ष कुमार आणि प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे हे उपस्थित होते.

ठाणे, पालघर, मुंबई उपनगर, नवी मुंबई या जिल्ह्यांतील मुद्रा योजना, दलित व्हेंचर कॅपिटल, स्टार्ट अप अशा योजनांचा लाभ घेतलेले २०० यशस्वी उद्योजक दिवसभराच्या या आर्थिक लोकशाही परिषदेत सहभागी झाले होते. राष्ट्रपती पदावर विराजमान झाल्यावर पहिल्यांदाच प्रबोधिनीत आलेले रामनाथ कोविंदजी जुन्या आठवणींना उजाळा देताना सहभागींशी हितगूज करत म्हणाले की, “मी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत यापूर्वी १० ते १२ वेळा विविध विषयांवर प्रशिक्षण घेण्यासाठी व देण्यासाठी आलो आहे. तुमच्यासारखाच प्रशिक्षणार्थी म्हणून मी स्व. प्रमोद महाजन आणि प्रबोधिनीचे आत्ताचे उपाध्यक्ष खा. विनय सहस्रबुद्धे यांच्याकडून प्रशिक्षण घेतले आहे. या संस्थेच्या आवारात आज मी राष्ट्रपती म्हणून आलो तेव्हा इथल्या अनेक आठवणी जाग्या झाल्या,” असे उद्गार काढताना ते भावुक झाले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राच्या प्रगतीचा आलेख मांडला. या उद्घाटन सत्रात प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खासदार विनय सहस्रबुद्धे यांनी प्रास्ताविक केले, तर अध्यक्ष अनिरूद्ध देशपांडे यांनी आभार मानले.

या उद्घाटन सत्रानंतर परिषदेत पहिले सत्र हे आर्थिक लोकशाही : संधी आणि आकांक्षा या विषयावर झाले. यात राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष कुमार, सीडबीचे उप कार्यकारी संचालक ए. के. कपूर, दलित इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे (डिक्कीचे) अध्यक्ष मिलिंद कांबळे आणि वऱ्हाड कॅपिटलचे कार्यकारी संचालक प्रसाद दहापुते यांनी मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्षा म्हणून मध्य प्रदेशातील राज्यसभेच्या खासदार संपतीया उईके यांनी जबाबदारी पार पाडली. यानंतरचे दुसरे सत्र पणन : नावीन्यपूर्ण उपक्रम आणि बाजाराची उपलब्धी या संकल्पनेवर बेतलेले होते. खादी ग्रामोद्योग महामंडळाचे अध्यक्ष विनयकुमार सक्सेना यांनी या सत्राचे अध्यक्षपद भूषविले, तर दिल्ली विद्यापीठाचे प्रा. हर्ष वर्मा आणि अँगिलिओ या संस्थेचे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजय त्रिपाठी यांनी मार्गदर्शन केले. यानंतर दुपारी एकाच वेळी दोन समांतर सत्रांचे आयोजन या परिषदेत करण्यात आले

त्यातले एक सत्र हे वित्त आणि कर्ज यांच्याशी संबंधित विषयांवर होते, तर दुसरे सत्र हे सल्लागार, नेटवर्किंग आणि अन्य प्रशिक्षणे यांच्या समस्या या विषयावर साकारले होते. दोन स्वतंत्र सभागृहांत पार पडलेल्या या विषयांपैकी वित्त आणि कर्ज या विषयावरील सत्रात आर्थिक विषयातील तज्ज्ञ सईद झफर इस्लाम यांनी अध्यक्षपद भूषविले.यात युनियन बँकेचे महाव्यवस्थापक पी. सी. पाणीग्रही, बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रमुख जिल्हा व्यवस्थापक अनिल सावंत, टॅलेन्टो

> "नोकरी मिळत नाही म्हणून स्वयंरोजगार करावा लागतो अशी अगतिकता न बाळगता नोकरीतील संधी भलेही सोडा, स्वतः रोजगार निर्माते बना, स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरू करून व्यवसाया-तील छोट्यामोठ्या संधींचा लाभ घेत नोकऱ्या मागणारे नव्हे, तर नोकऱ्या देणारे हात बना.
> – रामनाथ कोविंद, राष्ट्रपती, भारत

या आर्थिक संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष अग्रवाल यांनी आपले विचार मांडले. सल्लागार, नेटवर्किंग आणि अन्य प्रशिक्षणे यांच्या समस्या या विषयावरील सत्राचे अध्यक्षपद मायक्रो-टेक ग्लोबल फाउंडेशनचे अध्यक्ष आणि फिक्कीचे सदस्य डॉ. पी. शेखर यांनी भूषविले. या सत्रांत देआसरा या संस्थेच्या वैशाली अपराजित आणि भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे तांत्रिक सल्लागार बानूचंद्र नागराजन यांनी मार्गदर्शक म्हणून जबाबदारी पार पाडली. या आर्थिक लोकशाही परिषदेच्या समारोप सत्राला अरुणाचल प्रदेश या राज्याचे मुख्यमंत्री पेमा खांडू आणि केंद्रीय अर्थ राज्यमंत्री शिवप्रताप शुक्ला हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते; तर नाबार्डचे सहव्यवस्थापकीय संचालक एच. आर. दवे, म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे आणि प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे या प्रसंगी उपस्थित होते.

## १.२
## राष्ट्रीय परिषद : एक देश – एक निवडणूक
### २०-२१ जानेवारी २०१८

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच बोलविलेल्या सर्व राजकीय पक्षांच्या बैठकीत एक देश - एक निवडणूक हा विषय आग्रहाने मांडला होता. या पार्श्वभूमीवर रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने दि. २०-२१ जानेवारी २०१८ रोजी एक देश - एक निवडणूक या विषयावर आधारित राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. प्रबोधिनीच्या केशव सृष्टी, भाईंदर येथील प्रशिक्षण संकुलात झालेल्या या परिषदेचे उद्घाटन नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार यांनी केले. भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद (आय.सी.एस.एस.आर.) संस्थेचे सदस्य सचिव प्रा. व्ही. के. मल्होत्रा आणि भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद (आय.सी.सी.आर.) या संस्थेचे नवनियुक्त अध्यक्ष खा. डॉ.विनय सहस्रबुद्धे, प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्या श्रीमती रेखा महाजन, अरविंद रेगे आणि प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे ही मंडळी या उद्घाटन समारंभाला उपस्थित होती. या परिषदेची संकल्पना मांडताना डॉ. विनय सहस्रबुद्धे म्हणाले की, देशात दरवर्षी सातत्याने कुठेनाकुठे निवडणुका होत असतात हा एक प्रकारे धोरण लकवाच म्हणावा लागेल. त्यापासून देशाला वाचवायचे असेल, तर एक देश - एक निवडणूक या विषयावर लोकप्रतिनिधी आणि मतदार यांच्यात रचनात्मक संवाद होणे नितांत गरजेचे आहे. राजीव कुमार यांनी आपल्या भाषणात अनेक बाबींचा उल्लेख करत असे म्हटले की, जर आपल्या देशवासीयांनी एक देश - एक निवडणूक घेण्याचे निश्चित केले, तर एक देश म्हणून आपला कितीतरी पैसा वाचेल आणि तोच पैसा आपल्याला अनेक विकास कामांत व पायभूत सुविधा निर्माण करण्यात उपयोगात आणता येईल.

उद्घाटन सत्रानंतरचे पहिले सत्र हे वारंवार निवडणुका घेण्यातले धोके या विषयावर झाले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी नेहरू म्युझियम मेमोरियल लायब्ररीचे (NMML) संचालक डॉ. शक्ती सिन्हा होते. या सत्रात पिपल फॉर नेशनचे संस्थापक मनोज अग्रवाल, दिल्ली विद्यापीठाचे प्रा. एस. पी. सिंग आणि डॉ. हिमांशू रॉय या वक्त्यांनी चर्चा घडवून आणली.

दुसऱ्या सत्रात समांतर सत्रांची रचना करण्यात आली होती. त्यात अनेक वेळा घेतल्या जाणाऱ्या निवडणुका आणि त्यांतील समस्या; सलग निवडणुका: संकल्पना, व्यवहार्यता आणि अंमलबजावणी; सार्वत्रिक निवडणुका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची एकत्रित अंमलबजावणी: व्यवहार्यता आणि अंमलबजावणी यांच्याशी संबंधित समस्या; सलग निवडणूका: जागतिक अनुभव; एक देश - एक निवडणूक : घटनात्मक तरतूद या विषयांवरील सत्रे घेण्यात आली. अनुक्रमे प्रा. डॉ. एस. पी. सिंग, दिल्ली विद्यापीठ; प्रा. डॉ. एस. के. काक, आय. आय. टी. बीएचयु; संतोष गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी, आय. एस. आर. एन.; प्रा. डॉ. वंदना मिश्रा, दिल्ली विद्यापीठ; डॉ. रवी टेकचंदानी, सहप्राध्यापक; डॉ. हिमांशू रॉय, दिल्ली विद्यापीठ यांनी वरील सत्रांची अध्यक्षपदे भूषविली आणि प्रत्येक विषयाची चर्चा एका उंचीवर नेऊन ठेवली.

त्यामुळे विविध राज्यांतून आलेल्या सहभागींच्या शंकांना योग्य उत्तर मिळत गेल्याने परिषदेचा हेतू साध्य होण्यास मदत झाली.

या परिषदेच्या निमित्ताने विविध सहा विषयांवर संशोधन लेख मागविण्यात आले होते. त्याला देशभरातील विद्यार्थी आणि अभ्यासक यांच्याकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. त्यांतील निवडक ३१ उत्कृष्ट संशोधन लेखांना या विषयावर काढण्यात आलेल्या पुस्तिकेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. या परिषदेच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजे २१ जानेवारी रोजी सकाळी पहिले सत्र सलग निवडणुका: विदेशी अनुभव या विषयावर योजण्यात आले होते. आय.सी.एस.एस.आर.चे सदस्य सचिव प्रा. व्ही. के. मल्होत्रा यांनी या सत्राचे अध्यक्षस्थान सांभाळले. त्यांच्यासोबत गौतम बुद्ध विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस. के. सिंग आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या प्रा. डॉ. अमिता सिंग यांनी आपले विचार मांडले. या दिवसाचे दुसरे सत्र हे सलग निवडणुका : राजकारणी कसा विचार करतात या विषयावर योजण्यात आले होते. या सत्राचे अध्यक्षपद हरयाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी भूषविले, तर लोकसभेचे संसद सदस्य डॉ. बैजयंत पांडा आणि राज्यसभा खासदार के. सी. त्यागी यांनी या सत्रात आपले विचार मांडले आणि उपस्थितांच्या प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली.

या सत्राचे यजमान या नात्याने राज्यसभा खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी आपले विचार मांडले. या परिषदेच्या निमित्ताने प्रबोधिनीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रॅटिक लिडरशीप या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी एक देश एक निवडणूक या संकल्पनेवर आधारित चित्रप्रदर्शनी तयार केली होती. त्याला उपस्थित मान्यवर आणि सहभागींनी खूप चांगली दाद दिली. या परिषदेचा समारोप लोकसभेचे माजी सचिव डॉ. सुभाष कश्यप आणि हरयाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या वेळी आय.सी.एस.एस.आर.च्या पश्चिम विभागाच्या संचालिका डॉ. डॉली सन्नी उपस्थित होत्या.

देशातील विविध तेरा राज्यांतील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांतील एकूण १२२ प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते. याच एक देश - एक निवडणूक या विषयावर इंदोर शहरात दिनांक १० मार्च २०१८ रोजी प्रबोधिनीच्या वतीने परिसंवाद योजण्यात आला होता. या परिसंवादात इंदोर मधील २५० नागरिक सहभागी झाले होते.

## १.३
## आंतरराष्ट्रीय परिषद आणि प्राचीन संस्कृती प्रतिनिधी संमेलन
### १ – ४ फेब्रुवारी २०१८

आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक अभ्यास केंद्राच्या वतीने सहावी आंतरराष्ट्रीय परिषद आणि प्राचीन संस्कृतींच्या प्रतिनिधींचे संमेलन १ ते ४ फेब्रुवारी २०१८ या कालखंडात प्रबोधिनीच्या भाईंदर येथील ज्ञान-नैपुण्य केंद्रात योजण्यात आले होते. ३२ देशातील २५ विविध प्राचीन संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे २५० प्रतिनिधी या संमेलनात पारंपरीक वेशभूषा परिधान करून सहभागी झाले होते. सगळे जग एकोप्याने राहावे, त्याच बरोबर आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, युरोप, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका आणि दक्षिण-पूर्व आशिया या देशांतील स्थानिक समुदायांतील परस्पर संबंध वाढावेत व दृढ व्हावेत या उद्देशाने १९९७ साली आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात आली. जगभरातील विविध प्राचीन परंपरा एका व्यासपीठावर आणणे हा या परिषदेचा मूळ उद्देश होता. स्त्रियांच्या माध्यमातून प्राचीन संस्कृतीतील देवत्व शोधणे ही यावर्षीच्या परिषदेची संकल्पना होती. परिषदेत चित्रण आणि अभिव्यक्तीच्या माध्यमातून देवत्वाच्या बाबतीत स्त्रियांची भूमिका विविध उपक्रम आणि सत्रांच्या माध्यमातून मांडण्यात आली. प्रबोधिनीच्या आवारात दुसऱ्यांदा ही परिषद योजण्यात आली. यापूर्वी २००३ साली प्रबोधिनीच्या ज्ञान-नैपुण्य केंद्रात पहिली परिषद योजण्यात आली होती. रा. स्व. संघाचे सरकार्यवाह भैयाजी जोशी आणि सह सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांच्या समवेत विविध देशांतील विद्वान या संमेलनात सहभागी झाले होते. रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे कार्यकर्ते शेखर पटेल, सौमित्र गोखले, शाम परांडे आणि अनिल वर्तक यांनी ही परिषद यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## १.४
## डिजिटल शाळांची राज्यस्तरीय प्रेरणा सभा
### २ मे २०१७

धुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ११०३ शाळांमध्ये डिजिटल वर्गांचे निर्माण केल्यावर म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकर्ते हर्षल विभांडिक यांनी महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यातील जिल्हा आणि विभाग स्तरावर ३६ ठिकाणी प्रेरणा सभा घेतल्या. या

सभांद्वारे त्यांनी डिजिटल शाळांचे महत्त्व जिल्हा परिषद शाळांचे शिक्षक आणि ग्रामसेवक यांना समजावून सांगितले. तसेच यात ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जाच्या वाढीसाठी डिजिटल शाळेचे महत्त्व काय आहे हे सांगितले आणि यासाठी लागणारी आर्थिक मदत कशी मिळवावी हे समजावून सांगितले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागांना प्रोत्साहित करण्यासाठी राज्यस्तरीय प्रेरणा सभेचे आयोजन दि. २ मे २०१७ रोजी प्रबोधिनीच्या ज्ञान नैपुण्य केंद्रात करण्यात आले होते. एप्रिल २०१७ पर्यंत महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यांनी सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये डिजिटल वर्गांची सोय उपलब्ध केली आहे, अशा जिल्ह्यांना रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव आणि शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यात धुळे, गोंदिया, हिंगोली आणि ठाणे या जिल्ह्यांनी आपल्या जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये डिजिटल वर्गाचे शंभर टक्के लक्ष्य गाठले त्यांचा गौरव करण्यात आला.

**म्हाळगी प्रबोधिनीची न्यू जर्सी मध्ये प्रेरणा सभा:**
या डिजिटल शाळांच्या कार्यक्रमांच्या अंतर्गत अनिवासी भारतीयांचा सहभाग वाढवून ग्रामीण भारतातील शिक्षणाचा स्तर उंचावण्याच्या हेतूने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने ७ जून २०१७ रोजी अमेरिकेतील न्यू जर्सी येथे प्रेरणा सभेचे आयोजन केले होते. महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे या प्रेरणा सभेत उपस्थित असलेल्या अमेरिकेतील अनिवासी भारतीयांशी संवाद साधला.

**म्हाळगी प्रबोधिनीच्या डिजिटल शाळेसंदर्भात पार पडलेले विविध उपक्रम:**

■ धुळे जिल्ह्यातील साखरी विभागातील काळदर गावातील सौर उर्जेवर चालणाऱ्या पहिल्या शाळेचे उद्घाटन २२ ऑगस्ट २०१७ रोजी करण्यात आले.

■ अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने ११ सप्टेंबर २०१७ रोजी दिल्ली येथील विज्ञान भवनात आयोजित केलेल्या छात्र नेता संमेलनात प्रबोधिनीच्या धुळे जिल्ह्यात यशस्वी झालेल्या डिजिटल शाळांच्या यशाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर उपस्थित होते.

■ दि. ५ नोव्हेंबर २०१७ रोजी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या डिजिटल शाळा प्रकल्पाला सेवा भारती या संस्थेने संत ईश्वर सन्मान देवून गौरव केला.

■ रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या डिजिटल शाळा प्रकल्पाला सीएसआरच्या माध्यमातून आर्थिक सहकार्य करण्याच्या हेतूने दि. १८ जानेवारी २०१८ रोजी ओ.एन.जी.सी.च्या अधिकाऱ्यांनी धुळे जिल्ह्यातील डिजिटल शाळांना भेटी दिल्या.

■ रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या डिजिटल शाळा प्रकल्पासोबत सौर उर्जा शाळांच्या प्रकल्पाद्वारे दि. २४ मार्च २०१८ पर्यंत जिल्हा परिषदेच्या ५० शाळा सौर उर्जेवर सुरू करण्यात आल्या आहेत.

## १.५
## दीनदयाळ कथा
### २४-२५ सप्टेंबर २०१७

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई; दीनदयाळ शोध संस्थान, दिल्ली आणि केंद्र सरकारचा संस्कृती विभाग या तीन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ आणि २५ सप्टेंबर २०१७ या कालावधीत दीनदयाळ कथा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्व. पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून या दोन दिवसीय कथेच्या कार्यक्रमाचे आयोजन तेरापंथ भवन सभागृह, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई येथे करण्यात आले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दिल्ली प्रांताचे सहसंघचालक आलोक कुमार यांनी दीनदयाळ उपाध्यायांच्या जीवनावर आधारित ही कथा सादर केली. या कथा कार्यक्रमाची प्रस्तावना दीनदयाळ शोध संस्थानचे उपाध्यक्ष भरत पाठक यांनी केली. भरत पाठक आणि आलोक कुमार यांचे स्वागत प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे यांनी केले.

पहिल्या दिवशी दि. २४ सप्टेंबर रोजी आलोकजींनी दीनदयाळजींचा जीवनपट आपल्या रसाळ वाणीने श्रोत्यांना उलगडून सांगितला. दुसऱ्या दिवशीच्या कथेत आलोकजींनी दीनदयाळजींच्या समाजचिंतनावर अर्थात एकात्म मानव दर्शनावर निरूपण केले. व्यक्ती, समाज आणि प्रकृती या तिघांच्या माध्यमातून आपण या साऱ्याचा विचार केला, तर सारं काही ठीक होईल हे विचार दीनदयाळजींनी मांडले आहेत. या दोन दिवसीय कथेचा समारोप राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह भैयाजी जोशी यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाला. ४५० हून अधिक श्रोत्यांनी या दोन दिवसीय कथेच्या कार्यक्रमाचा आनंद घेतला. भारतीय जनता पार्टीचे स्थानिक आमदार अतुल भातखळकर आणि त्यांचे सहकारी, कार्यकर्ते तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संघप्रेरित संघटनांच्या

कार्यकर्त्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

## १.६

## निर्णय प्रक्रियेच्या केंद्रस्थानी स्त्री : वास्तव आणि भविष्य – राष्ट्रीय परिसंवाद

### २६–२७ ऑक्टोबर २०१७

एकात्म मानवदर्शनचे प्रणेते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई; दृष्टी स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र, पुणे; दीनदयाळ शोध संस्थान दिल्ली आणि भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या सहयोगाने दि. २६-२७ ऑक्टोबर २०१७ या कालावधीत महाराष्ट्रातील पुणे येथे राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. निर्णय प्रक्रियेच्या केंद्रस्थानी स्त्री : वास्तव आणि भविष्य या विषयावर योजण्यात आलेल्या या राष्ट्रीय परिसंवादाला भारताच्या आठ राज्यांमधील महिलांच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या ५२ विविध सामाजिक संस्थांच्या १४५ महिला प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या.

या परिसंवादाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय संपर्क प्रमुख आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांनी केले. वर्तमान स्थितीत महिलांनी केंद्रस्थानी राहावे अशी समाजाची स्थिती किंवा मानसिकताही नाही हे विदारक सत्य त्यांनी मांडले. भारतीय स्त्री शक्ती या देशव्यापी संघटनेच्या संस्थापिका निर्मला आपटे यांनी या परिसंवादातील उद्घाटन सत्रात बीजभाषण केले.

उद्घाटन सत्रानंतर स्त्री-केंद्रित कुटुंब व्यवस्था या विषयावर पहिले सत्र योजण्यात आले होते. राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख कार्यवाहिका सीताक्का या सत्राच्या अध्यक्षा होत्या. भारतीय स्त्री शक्तीच्या महाराष्ट्र प्रदेशच्या अध्यक्षा रागिणी चंद्रात्रे, दिल्लीतील ज्येष्ठ वकील मोनिका अरोरा, मुंबईतील ज्येष्ठ वकील जाई वैद्य यांनी या सत्रात आपले विचार मांडले.

दुसरे सत्र स्त्री-केंद्रित संस्था जीवन या विषयावर झाले. या सत्राच्या अध्यक्षा मुंबई येथील एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. वसुधा कामत या होत्या. दिल्लीतील सामाजिक कार्यकर्त्या डॉ. ज्योती चौथाईवाले, इंदोर येथील ज्वाला संस्थेच्या डॉ. दिव्या गुप्ता, पुणे शहराच्या पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी या सत्रात आपले विचार सहभागींसमोर मांडले. तिसरे सत्र हे स्त्री-केंद्रित समाज जीवन या विषयावर साकारले होते. महाराष्ट्रातील अमरावती येथील संपूर्ण बांबू केंद्राच्या संस्थापिका निरूपमा देशपांडे या सत्राच्या अध्यक्षा होत्या. या सत्रात महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्या डॉ. नाहीद शेख, औरंगाबादच्या प्रतिभा फाटक, छत्तीसगढ महिला मंचच्या अध्यक्षा शताब्दी पांडे यांनी आपल्या कार्याचा परिचय देत समाज जीवनातील स्त्रीचे स्थान कसे महत्त्वाचे आहे हे सहभागींना विशद केले. स्त्री-केंद्रित सत्ताशक्ती या विषयाच्या चौथ्या सत्रात राष्ट्रीय महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा डॉ. पूर्णिमा अडवाणी यांनी अध्यक्षस्थान भूषविले. महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, मुंबईचे सामाजिक कार्यकर्ते भीम रासकर, शिवसेनेच्या प्रदेश प्रवक्त्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या सत्रात आपले विचार मांडले. या दोन दिवसांच्या परिषदेचा समारोप भाजपाचे आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. निर्णय प्रक्रियेच्या केंद्रस्थानी महिला असणे म्हणजे पुरुषांना बाजूला करणे असा अर्थ होत नाही, तर दोघांनाही समान संधी मिळावी या दृष्टीने या विषयाकडे बघण्याची आवश्यकता आहे; असे प्रतिपादन त्यांनी केले. मध्य प्रदेशच्या जनसंपर्क मंत्री अर्चना चिटणीस या समारोप सत्राच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. एक महिला मंत्री या नात्याने काम करताना आलेले अनुभव आपल्या भाषणात त्यांनी सांगितले. दृष्टी स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्राच्या सचिव अंजली देशपांडे यांनी परिषदेचे प्रास्ताविक केले तर परिषदेत झालेल्या सत्रांचे प्रतिवेदन प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांनी केले. संपूर्ण वंदेमातरम्ने या परिषदेचा समारोप झाला.

## १.७

## संवाद सभा

### १०–११ जून २०१७

संपादक, प्रकाशक, पत्रकार व लेखक यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी मागील चार वर्षांपासून संवाद सभेचे आयोजन करत आहे. अशा उपक्रमांबद्दल आस्था बाळगणाऱ्या संवादोत्सुक निवडक निमंत्रितांना या संवाद सभेत निमंत्रित केले जाते. निसर्गसुंदर, निकोप वातावरणातील खुली चर्चा असे या संवाद सभेचे स्वरूप असते. या अहवाल वर्षात ही संवाद सभा दि. १०-११ जून २०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. प्रबोधिनीच्या भाईंदर येथील ज्ञान-नैपुण्य केंद्राच्या संकुलात झालेल्या संवाद सभेला साहित्य, प्रकाशन आणि पत्रकारिता या क्षेत्रांतील ४९ नामवंत उपस्थित होते.

या संवाद सभेचे उद्घाटन ज्योत्स्ना प्रकाशनाचे विकास परांजपे, रागिणी पुंडलिक आणि प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या हस्ते करण्यात आले. आजची पत्रकारिता:आकलन आणि आव्हाने या विषयावरील परिसंवादाने संवाद सभेला प्रारंभ झाला. या परिसंवादात अंबरीश मिश्र, राजीव खांडेकर, सारंग दर्शने आणि मेघना ढोके यांनी सहभाग घेतला होता. गायिका किशोरीताई आमोणकर यांच्या निवडक रचनांचे श्रवण या विषयावर निवेदन करताना प्रा. केशव परांजपे यांनी १९५५ ते २००० या कालावधीतील किशोरीताईंचा देदीप्यमान संगीत प्रवास, संगीताद्वारे आध्यात्मिक प्रवास इत्यादी पैलूंची माहिती करून दिली. शैलीकार तळवलकर या विषयावरील परिसंवादात गिरीश कुबेर, प्रकाश जावडेकर आणि डॉ. मीना वैशंपायन यांनी सहभाग घेतला. मराठी भाषेची होत असलेली सार्वत्रिक हेळसांड या विषयावर बोलताना तज्ज्ञांकडून मान्यता घेऊनच त्यावरील मजकूर लिहिला जावा अशा अनेक पैलूंवर या परिसंवादात सहभागी झालेल्या राम जगताप, प्राची साठे आणि विवेक गोविलकर यांनी चर्चा केली. सामाजिक व्यंगचित्र या विषयात मधुकर धर्मापुरीकर आणि प्रशांत कुलकर्णी यांनी सामाजिक व्यंगचित्रांच्या छोट्याछोट्या क्लीप्स दाखवून त्या व्यंगचित्रांमागची रहस्ये उलगडून दाखविली. व्यंगचित्रकार एखादा विषय व्यंगचित्राद्वारे किती सहजपणे सादर करू शकतो हे सहज सोप्या भाषेत सादर केले.

या संवाद सभेनिमित्त शैलीकार गोविंद तळवलकर यांच्या ग्रंथांचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. या दोन दिवसीय संवाद सभेचा समारोप खेळीमेळीच्या वातावरणाने झाला. चारच वर्षांत दखल घेण्याजोगे स्थान संवाद सभेने पटकावले आहे. निसर्गरम्य वातावरणात दीड दिवसांची होणारी चर्चा वेगवेगळ्या माध्यमांतील पत्रकार, प्रकाशक, लेखक यांनी काही-ना-काही प्रकारे समाजमानसाचे मत बनविणाऱ्यांना दिशा देणारी असते असे या संवाद सभेत सहभागी मान्यवरांनी नमूद केले.

## १.८
## रवींद्र साठे यांचा चीन दौरा
### ३१ डिसेंबर २०१७ – ४ जानेवारी २०१८

म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे हे चीनमधील हैनान इन्स्टिट्यूट फॉर वर्ल्ड वॉच या संस्थेच्या निमंत्रणावरून दि. ३१ डिसेंबर २०१७ ते ४ जानेवारी २०१८ या कालावधीत चीनमधील झियान यांग व हायकू या दोन शहरांत अभ्यास दौऱ्यासाठी जाऊन आले. हैनान इन्स्टिट्यूट फॉर वर्ल्ड वॉच या संस्थेमार्फत दक्षिण आशियामधील देशांच्या राजकीय व सामाजिक घडामोडींचा अभ्यास करण्यात येतो. साठे यांनी हायकू येथील तरूण संशोधकांसमोर भारतातील पक्षीय राजकारण व राजकीय पक्षांच्या युवकांचे प्रशिक्षण या विषयावर मांडणी केली. राजकारणात करिअर करू इच्छिणाऱ्या युवकांसाठी भारतीय जनतांत्रिक नेतृत्व संस्थानच्या माध्यमातून प्रबोधिनीच्या वतीने अहवाल वर्षात ९ महिन्यांचा निवासी अभ्यासक्रम सुरू केला असल्याची माहितीही रवींद्र साठे यांनी आपल्या भाषणात दिली. चिनी संशोधकांनी या अभ्यासक्रमाबद्दल उत्सुकता दाखविली. याचबरोबर रवींद्र साठे यांनी आपल्या भेटीत झियान मिन्झू या विद्यापीठातील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांच्याबरोबरही आंतरक्रिया केली.

# २
# प्रशिक्षण

## २.१
## समाजभान शिबिर
### २१-२८ मे २०१७

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणांना सुट्टीच्या कालावधीत त्यांनी नव्या विषयांचा अभ्यास करण्याचा, नवीन तंत्रज्ञान अवगत करण्याचा ध्यास घ्यावा असे आवाहन केले होते. या पार्श्वभूमीवर रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने "आय एम न्यू इंडिया" या ब्रीदवाक्याला अधोरेखित करणारे आठ दिवसांचे समाजभान शिबिर आयोजित केले होते. दि. २१ ते २८ मे २०१७ या कालावधीत पार पडलेल्या या आठ दिवसांत आठ नवनव्या कौशल्यांची तोंडओळख या तरुणांना करून देण्यात आली.

समाजभान शिबिर या नावाने योजण्यात आलेल्या या शिबिरात महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांतून १६ ते २८ या वयोगटातील २१ तरुणांनी सहभाग घेतला होता. यामध्ये इयत्ता १० वी पासून ते तंत्रशिक्षणाचे व माध्यम अध्ययनाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. या शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्रातील ग्रामविकासाच्या क्षेत्रातील ज्येष्ठ कार्यकर्ते आणि हिवरेबाजारचे माजी सरपंच पोपटराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या आसपास घडणाऱ्या निसर्गातील घटनांचा अभ्यास डोळसपणे करण्याचे आवाहन त्यांनी सहभागी तरुणांना केले. या शिबिरात बदलता भारत, राष्ट्रीय एकात्मता, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, स्त्री-पुरुष समानता : आदर्श भूमिका आणि वास्तव, समाज माध्यमातील समस्या आणि विरोधाभास, भारतातील मुख्य कायदे, समाज माध्यमांच्या युगातील मित्रपरिवार अशा विविध विषयांवरील सत्रे योजण्यात आली होती. या सत्रांत आदित्य पाठक, प्रा. अविनाश कोल्हे, डॉ. सुवर्णा रावळ, रागिणी चंद्रात्रे, शेफाली वैद्य, ॲड. आशिष चव्हाण, डॉ. स्वप्ना पाटकर या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

तसेच या शिबिरात व्यवहार कौशल्य केंद्रित सत्रे घेण्यात आली. यात प्रामुख्याने मित्र कसे बनवावेत, संभाषण कौशल्ये, गट चर्चा, चित्रपट समीक्षण, संशोधन आणि सर्वेक्षण, व्यवसाय नियोजन, स्वतःची माहिती तयार करणे (रेझ्युमे तयार करणे) या कौशल्यांची माहिती या तरुणांना करून देण्यात आली. यात रवींद्र साठे, मंदार भारदे, शशिकांत सावंत, यशवंत ठकार, संदीप सिंग, मिलिंद चाळके, देवेंद्र पै यांनी मार्गदर्शन केले. याव्यतिरिक्त समाज परिवर्तनाचे शिलेदार या सत्रात ज्योती पाटकर (मानवी तस्करी), विजय जाधव (रेल्वे फलाटावरील मुले), विद्याधर वालावलकर (इस्पितळातील कचरा व्यवस्थापन), विवेक अत्रे यांनी सहभागींना समाज प्रबोधनाच्या वेगळ्या वाटांचा विचार करायला लावले. तसेच व्यवसाय आणि उद्योजकता या सत्राचे संचलन देवेंद्र पै यांनी केले. या सत्रात शक्ती साळगावकर, संचालक, कालनिर्णय; संदेश सुधीर भट, मुख्य कार्यकारी अधिकारी, सुयोग नाट्य संस्था; तेजस लोमटे, उद्योजक, व्हेरिटा टेक्नॉलॉजी; प्रथमेश सावंत, हेअर स्टाइलर यांनी व्यवसायातील नावीन्यपूर्ण वाटा समजावून सांगितल्या. राष्ट्रीय सुरक्षा या विषयावर तिसरे सत्र पार पडले. या सत्राला फोरम फॉर इंटिग्रेटेड नॅशनल सिक्युरिटी (फिन्स) या संस्थेचे कर्नल त्रिपाठी, सहसंस्थापक; कॅ. स्मिता गायकवाड, संशोधक; गोपाळ ढोक, संशोधक यांनी देशापुढे असलेली सुरक्षेबाबतची अंतर्गत व बाह्य

आव्हाने सहभागींना समजावून सांगितली व या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तरुणांनी काय करायला हवे याबाबत मार्गदर्शन केले.

याशिवाय सहभागी दररोज सकाळी ६.०० वाजता योग अभ्यासासाठी एकत्र येत होते. या सगळ्या सत्रांबरोबर सहभागी तरुणांना केशवसृष्टी येथील कृषी केंद्रावर शेतकऱ्याचे काम समजावून देण्याच्या हेतूने श्रमदानाच्या माध्यमातून त्यांना दोन दिवस शेतीविषयक प्रत्यक्ष कामाचा अनुभव देण्यात आला. तसेच आपल्या देशातील आदिवासी बांधवांचे जीवनमान जवळून दाखविण्याच्या हेतूने जव्हार आणि मोखाडा येथील वनवासी क्षेत्रात प्रगती प्रतिष्ठान या संस्थेला प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या विविध प्रकल्पांवर भेटी देण्यात आल्या. त्याचबरोबर मिलिंद थत्ते यांच्या वयम् चळवळ या संस्थेच्या माध्यमातून आदिवासी पाड्यावर एका रात्रीचा निवास करून व श्रमदान करून वनवासींचे प्रत्यक्ष जीवन अनुभवता आले. एकूणच या शिबिराची रचना लक्षात घेता हा जीवनाला नवीन प्रेरणा देणारा अनुभव होता, असे मनोगत बहुतांशी सहभागींनी व्यक्त केले.

## २.२
## वक्तृत्वकला आणि संवादकौशल्ये प्रशिक्षण शिबिर
### ५-६ ऑगस्ट २०१७

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि अस्तित्व सोशल फाउंडेशन, नाशिक या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५-६ ऑगस्ट २०१७ या कालावधीत गंगापूर रोड, नाशिक येथील बिग सिटी येथे वक्तृत्वकला आणि संवादकौशल्ये प्रशिक्षण शिबिर योजण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिरात नाशिक शहर व आसपासच्या तालुक्यांतून १३ पुरुष आणि ११ महिला असे एकूण २४ प्रतिनिधी सहभागी झाले होते. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन स्वामी समर्थ बाल संस्कार केंद्राचे नितीन दादा मोरे आणि अस्तित्व सोशल फाउंडेशनच्या सुवर्णा कोठावदे यांच्या उपस्थितीत पार पडले.

या प्रशिक्षण शिबिरात वाचन आणि व्यासंग, संवादकौशल्ये, देहबोली, निवेदन आणि सूत्रसंचालन, उच्चारशास्त्र व आवाजाची जोपासना, भाषणकला या विषयांवर डॉ. रामदास गुजराथी, प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे, आकाशवाणी निवेदक राजेंद्र पाटणकर, ज्येष्ठ रंगकर्मी प्रमोद पवार, प्राध्यापक दिलीप फडके यांनी सहभागींना मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनानंतर काही सहभागींकडून प्रात्यक्षिके करून घेत, दृक-श्राव्य चित्रीकरण त्यांचे दोष व मर्मस्थळे दाखवून फडके सरांनी सहभागींना मार्गदर्शन केले.

## २.३
## अंत्योदय दिशादर्शन शिबिर
### २९-३१ मार्च २०१८

या अहवाल वर्षात रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने दीनदयाळ उपाध्यायजींच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. केंद्र सरकारच्या अनेक योजनांचा मूलभूत विचार हा समाजातल्या शेवटच्या माणसाचा विकास कसा होईल हे लक्षात घेऊन राबविला जात आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थांच्या कार्यकर्त्यांना केंद्रिभूत ठेवून म्हाळगी प्रबोधिनीने भारत सरकारच्या संस्कृती विभागाच्या सहकार्याने दि. २९, ३०, ३१ मार्च २०१८ या कालावधीत अंत्योदय दिशादर्शन शिबिराचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ अभ्यासक व तत्त्वचिंतक डॉ. महेशचंद्र शर्मा यांच्या बीजभाषणाने झाले. या कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते भिकूजी (दादा) इदाते, म्हाळगी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे आणि प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे उपस्थित होते. या शिबिरात १३ राज्यातून विविध सामाजिक संस्थांचे १२२ प्रतिनिधी सहभागी झाले होते. तीन दिवस चाललेल्या या शिबिरात पहिल्या दिवशी उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण यांच्या पार्श्वभूमीवर अंत्योदय या पहिल्या सत्रात डॉ. महेशचंद्र शर्मा यांनी आपले विचार मांडताना युरो-अमेरिकन देशांच्या जागतिकीकरणाच्या नीतीवर प्रकाश टाकला.

प्रशिक्षणांचे अन्य कार्यक्रम पुढील प्रमाणे...

| दिनांक | कार्यक्रमाचे नाव | संख्या | स्थान |
|---|---|---|---|
| १५ - १६ जुलै २०१७ | पायोनिअर एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई : शिक्षक क्षमता संवर्धन प्रशिक्षण शिबिर | ११२ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| १२ ऑगस्ट २०१७ | स्वयंप्रतिमा : शोध अंतर्बाह्य प्रतिमेचा | ०५ | चंचल स्मृती, वडाळा |
| ११-१२ नोव्हें. २०१७ | रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी : कार्यकारी समिती व आजीव सदस्य प्रशिक्षण वर्ग | १०० | रत्नागिरी |
| १८-१९ नोव्हें. २०१७ | सामाजिक संस्था आवश्यक कायदे : प्रशिक्षण शिबिर | ४१ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| २३-२४ डिसें. २०१७ | राजकीय कार्यकर्त्यांसाठी भाषणकला : प्रशिक्षण शिबिर | ३३ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| २९-३० डिसें. २०१७ | चेंबूर एज्युकेशन सोसायटी : शिक्षक क्षमता संवर्धन शिबिर | ४५ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| १०-११ फेब्रु. २०१८ | वक्तृत्वकला आणि संवाद कौशल्ये : प्रशिक्षण शिबिर | ४० | ज्ञान-नैपुण्य केंद्र |

## २.४
## भाजपा प्रशिक्षण शिबिर

भारतीय जनता पार्टीच्या वतीने २०१७-१८ या वर्षात महाराष्ट्रातील विविध महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या यांच्या माध्यमातून निवडून आलेल्या आपल्या लोकप्रतिनिधींसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन प्रबोधिनीच्या सहयोगाने करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमांना डॉ. विनय सहस्रबुद्धे, व्ही. सतीश,डॉ. संबीत पात्रा, गिरीश महाजन, स्व. पांडुरंग फुंडकर, मुरलीधर राव, रवींद्र भुसारी, माधव भांडारी, विजया रहाटकर, योगेश सागर, श्रीकांत भारतीय, सतीश धोंड, अनिल सोले, प्रवीण बर्दापूरकर, दीपक करंजीकर या मान्यवरांनी विविध प्रशिक्षणांमधून मार्गदर्शन केले. हे कार्यक्रम पुढीलप्रमाणे...

| दिनांक | कार्यक्रमाचे नाव | सहभागी संख्या | स्थान |
|---|---|---|---|
| १२ - १३ एप्रिल२०१७ | खामगाव विधानसभा :<br>जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य आणि नगरसेवक प्रशिक्षण शिबिर | ७९ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| ४ - ५ - ६ मे २०१७ | पिंपरी-चिंचवड महानगरपालिका : नगरसेवक प्रशिक्षण शिबिर | ७२ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| १३ - १४ मे २०१७ | महाराष्ट्र प्रदेश :<br>पं. दीनदयाळ उपाध्याय जन्मशताब्दी विस्तारक योजना प्रशिक्षण वर्ग | १२६ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| २४ - २५ जून २०१७ | पनवेल महानगरपालिका :<br>नगरसेवक प्रशिक्षण शिबिर | ६७ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| १ - ५ जुलै २०१७ | छत्तीसगढ :<br>कुरूद विधानसभा कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर | ६४ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| २८-२९-३० जुलै २०१७ | नागपूर महानगरपालिका :<br>नगरसेवक प्रशिक्षण शिबिर | १०७ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| २८-२९-३० जुलै २०१७ | महाराष्ट्र प्रदेश :<br>प्रवक्ते-चर्चा प्रतिनिधी अभ्यासवर्ग | ३७ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| ५ - ६ ऑगस्ट २०१७ | ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, नवी मुंबई महानगरपालिका : नगरसेवक प्रशिक्षण शिबिर | १०५ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| १७-१८-१९ सप्टेंबर २०१७ | नाशिक महानगरपालिका :<br>नगरसेवक आणि पदाधिकारी प्रशिक्षण शिबिर | १३९ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| ३ - ४ ऑक्टोबर २०१७ | महाराष्ट्र प्रदेश :<br>अनुसूचित जाती मोर्चा पदाधिकारी प्रशिक्षण वर्ग | १५४ | ज्ञान-नैपुण्य केंद्र |
| २१-२२ फेब्रुवारी २०१८ | मीरा-भाईंदर महानगरपालिका :<br>नगरसेवक आणि पदाधिकारी प्रशिक्षण शिबिर | ६० | ज्ञान-नैपुण्य केंद्र |

# ३. अन्य कार्यक्रम

## ३.१
## स्व. प्रमोद महाजन पुण्यतिथी
### ३ मे २०१७

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या उत्तन येथील कार्यालयामध्ये स्व. प्रमोद महाजन यांच्या ११व्या पुण्यतिथीनिमित्त बुधवार दि. ३ मे २०१७ रोजी आठवणीतले प्रमोदजी या विषयावर भा.ज.पा.चे मुंबई महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवक गणेश खणकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. गणेश खणकर यांनी प्रमोद महाजन यांच्याबरोबर काम करताना आलेले अनुभव कथन केले. तसेच प्रमोद महाजनांच्या जुन्या स्मृतींना उजाळा दिला. यावेळी प्रबोधिनीचे तसेच विविध आस्थापनांचे ८५ कर्मचारी उपस्थित होते.

## ३.२
## रामभाऊ म्हाळगी जयंती
### ८ जुलै २०१७

शनिवार दि. ८ जुलै २०१७ रोजी प्रबोधिनीच्या संकुलातील एकात्म भवन येथे रामभाऊ म्हाळगी यांच्या जयंतीनिमित्त दमण व दीवचे प्रभारी रघुनाथ कुलकर्णी यांनी रामभाऊ म्हाळगी यांच्या जीवनावर आपले विचार मांडले. यावेळी प्रबोधिनीचे अधिकारी व कर्मचारी तसेच विविध आस्थापनांचे कर्मचारी असे ९५ जण उपस्थित होते.

**प्रबोधिनीत पार पडलेले अन्य कार्यक्रम :**

| दिनांक | कार्यक्रमाचे नाव | सहभागी संख्या | वक्ता/सहभागी |
|---|---|---|---|
| १३ एप्रिल २०१७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | ९० | माधव भांडारी |
| २३ जून २०१७ | डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी स्मृतिदिन, ग्रंथवाचन | १५ | हेमंत देवधर, दिलीप नवेले |
| ७ जुलै २०१७ | श्यामाप्रसाद मुखर्जी स्मृतिदिन | २० | मिलिंद चाळके, भीमराव पांचाळ |
| १८ जुलै २०१७ | ज. द. जोगळेकर व बाळासाहेब आपटे स्मृतिदिन | २२ | सागर पाटील, दिलीप वळवी |
| २३ ऑगस्ट २०१७ | डॉ. भीमराव गस्ती श्रद्धांजली सभा | १५ | रमेश पतंगे, गिरीश प्रभुणे आणि शामराव अत्रे |
| २७ फेब्रु. २०१८ | मराठी भाषा दिन : पुस्तक वाचन | १५ | गजानन सातुर्डेकर, अविनाश डोळस |

# ४.
# प्रबोधन

## ४.१
## अंत्योदय पुरस्कार २०१८
### २६ मार्च २०१८

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने दिला जाणारा व मुंबईतील कै. बाळासाहेब गोखले व श्यामला गोखले न्यासाने पुरस्कारित केलेला अंत्योदय पुरस्कार यंदा परिवर्तन महिला संस्थेच्या वर्षा परचुरे यांना सोमवार दि. २६ मार्च २०१८ रोजी झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

समाजाच्या तळागाळातील लोकांच्या सक्षमीकरणासाठी संस्थेच्या माध्यमातून कार्यरत असणाऱ्या व्यक्तीला सन २००० पासून अंत्योदय पुरस्कार देण्यात येत आहे. महिला परिवर्तन संस्थेच्या माध्यमातून पालघर जिल्ह्यातील अतिदुर्गम अशा मोखाडा तालुक्यातील वनवासी महिलांच्या सक्षमीकरणासाठी गेली अनेक वर्षे त्याच भागात राहून काम करणाऱ्या वर्षा परचुरे यांना हा पुरस्कार देण्यात आला.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आ. डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोकण प्रांत संघचालक डॉ. सतीश मोढ होते. प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांनी पुरस्कारामागची भूमिका मांडली. सत्कारमूर्ती वर्षा परचुरे यांनी सत्काराला उत्तर देताना म्हटले की, मोखाडा भागातील महिलांचे कायमस्वरूपी सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने आम्ही काम करत आहोत. हे कार्य खूप मोठे आहे. १० गावांतील १०० पाड्यांवर सध्या हे काम सुरू आहे. ही तर आमची सुरुवात आहे. या पुरस्कारामुळे आमचा कामाचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी व स्त्री आधार केंद्र, पुणे या संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा आमदार डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, समाजात वावरताना आणि काम करताना साध्य आणि साधना यांतला फरक समजणे खूप गरजेचे असते. हेतू चांगला असला की कामाची रचना आपोआप घडत जाते. वर्षा परचुरे यांच्या परिवर्तन संस्थेचे हे रचनात्मक काम त्यामुळे अधिक अभिनंदनीय ठरते. अध्यक्ष डॉ. सतीश मोढ यांनी अशा कार्याची अपेक्षा व्यक्त करताना म्हटले की, या देशात रोजगार निर्मितीचे कार्य जर वेगाने करायचे असेल, तर ४० टक्के रोजगार सामाजिक कार्यातून निर्माण होऊ शकतात आणि हे कार्य महिला कार्यकर्त्यांकडून चांगल्या प्रकारे घडू शकते, म्हणून महिलांना निर्भय वातावरण देणे ही काळाची गरज आहे. या कार्यक्रमाला सामाजिक क्षेत्रातील ८० सहभागी उपस्थित होते. गोखले न्यासाच्या चंदा गोखले यांनी आभार मानले. संपूर्ण पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ४.२
## स्वा. सावरकर स्मृती आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा
### १० सप्टेंबर २०१७

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि सावरकर दर्शन प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येणारी स्वा. सावरकर स्मृती आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा यंदा पुणे येथील सदाशिव पेठेतील भावे प्राथमिक शाळेच्या सभागृहात संपन्न झाली. यंदा स्पर्धेचे तेरावे वर्ष होते. या स्पर्धेकरिता संपूर्ण महाराष्ट्रातून १८ महाविद्यालयांचे संघ आले होते. प्रत्येक संघाचे दोन याप्रमाणे ३६ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. "भारत-इस्रायल मैत्री पर्वामुळे भारत-अरब राष्ट्रे संबंध बिघडतील" हा विषय स्पर्धेसाठी देण्यात आला होता. राज्यातील पुणे, नाशिक, विरार, भाईंदर, ठाणे, जयसिंगपूर आणि इस्लामपूर येथील महाविद्यालयांचे विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. रविवार दि. १० सप्टेंबर २०१७ रोजी पार पडलेली ही स्पर्धा अतिशय रंगली. या स्पर्धेत सांघिक विभागात आय.एल.एस. विधी महाविद्यालय, पुणे या संघाने प्रथम

पारितोषिक पटकावले तर पुण्याच्याच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने द्वितीय पारितोषिक प्राप्त केले. वैयक्तिक गटातील तीनही पारितोषिके यंदा पुणे शहराने पटकावली. प्रथम पारितोषिक आय.एल.एस. विधी महाविद्यालयाच्या महेश गडदे याने जिंकले. त्याला २५०१/- रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, सावरकर ग्रंथ आणि सावरकरांच्या चित्रपटाची व्ही.सी.डी. देण्यात आली. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नचिकेत पानसेने द्वितीय तर मॉडर्न महाविद्यालयाच्या सुशारद देशपांडेने तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना अनुक्रमे २००१/- रुपयांचे व १५०१/- रुपयांचे रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, सावरकर ग्रंथ आणि सावरकरांच्या चित्रपटांची व्ही.सी.डी. देण्यात आली.

नाशिकच्या भोसला मिलिटरी स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाची गायत्री जोशी, जयसिंगपूरच्या जे.जे. मगदूम इंजिनिअरिंग महाविद्यालयाचा चेतन माडगूळकर आणि पुण्यातील शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाचा करण तुपे यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. ज्येष्ठ पत्रकार रविकिरण साने, पत्रकार निरंजन आगाशे आणि वृत्त निवेदिका स्वाती महाळंक यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली. भावे शाळेच्या सभागृहात सायंकाळी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. चांगला वक्ता व्हायचं असेल, तर खूप वाचलं पाहिजे. दुसऱ्यांची भाषणे ऐकली पाहिजेत, भाषणाला जाण्याआधी चांगली तयारी केली पाहिजे. इंटरनेटवरून माहिती सरसकट न घेता (कटपेस्ट न करता) आपल्याकडे चांगली ग्रंथसंपदा आहे त्यातून नेमके व अचूक शोधून ते आपल्या भाषेत मांडत आपली वक्तृत्व साधना जोपासा, तरच तुम्ही चांगले वक्ते होऊ शकता. असे उद्‌गार विजय कुवळेकर यांनी या प्रसंगी बोलताना काढले.

## ४.३
## हिंदुत्व अध्ययन (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रम
### ९-१०-११ मार्च २०१८

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि सावरकर दर्शन प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ९-१०-११ मार्च २०१८ या कालावधीत प्रबोधिनीच्या भाईंदर उत्तन येथील ज्ञान-नैपुण्य केंद्रात हिंदुत्व अध्ययन (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न झाला. या अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन राष्ट्रीय प्राध्यापक व विचारवंत डॉ. अशोकराव मोडक यांच्या भाषणाने झाले. या वेळी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे उपस्थित होते. प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांनी प्रास्ताविक केले.

तीन दिवसांच्या या अभ्यासक्रमात महाराष्ट्रातील ९ जिल्ह्यांतून व गोवा राज्यातून ३५ पुरुष व एक महिला असे ३६ हिंदुत्व अभ्यासक सहभागी झाले होते. आंतरराष्ट्रीय राष्ट्रवादाच्या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रवादाचा म्हणजे हिंदुत्वाचा अभ्यास राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून करू इच्छिणाऱ्या युवा कार्यकर्त्यांना दहा विविध विषयांचा परिचय करून देण्यात आला.

या अभ्यासक्रमात राष्ट्रवादाचा उदय आणि वाटचाल, निधर्मी राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते व भाष्यकार, भारतीय कम्युनिस्ट (स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भूमिका), हिंदुत्व आणि राष्ट्रवाद (स्वा. सावरकर), भारतीय उपखंडातील राष्ट्रवादाचा विकास, हिंदी राष्ट्रवाद, हिंदुत्व आणि राष्ट्रवाद (रा. स्व. संघ), ख्रिस्ती समाज : स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भूमिका, मुस्लिम समाज : स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भूमिका, लोकजीवनातील हिंदुत्व या विषयांवर अनुक्रमे प्रा. म. मो. पेंडसे, अरविंद कुळकर्णी, भाऊ तोरसेकर, डॉ. आदित्य धोपटकर, प्रा. अविनाश कोल्हे, अरविंद कुळकर्णी, रतन शारदा, ज्येष्ठ पत्रकार मोरेश्वर जोशी, अँड किशोर जावळे, डॉ. सुवर्णा रावळ यांनी आपले विचार मांडले. समारोपाच्या सत्रात रा. स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि स्वा. सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे अध्यक्ष भिकू (दादा) इदाते यांनी राष्ट्रवादापुढील वर्तमान आव्हाने हा विषय मांडला. या तीन दिवसीय अभ्यासक्रमाचे सूत्रसंचालन प्रबोधिनीचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी मिलिंद चाळके यांनी केले.

## ४.४

# गुरुवार सभा :

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या त्रिसूत्रीनुसार प्रबोधनाच्या क्षेत्रातील सातत्य राखत गेली अनेक वर्षे सुरू असलेला उपक्रम म्हणून गुरुवार सभेचा उल्लेख करता येईल. दर महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी प्रबोधिनीच्या चंचल स्मृती, वडाळा येथील कार्यालयाच्या सभागृहात वर्तमान महत्त्वाच्या विषयावर त्या क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती किंवा अभ्यासक यांच्या भाषणाचे आयोजन करण्यात येते.

**वर्षभरात पार पडलेल्या गुरुवार सभांचे विषय पुढीलप्रमाणे...**

| दिनांक | कार्यक्रमाचे नाव | वक्ते | सहभागी संख्या |
|---|---|---|---|
| २७ एप्रिल २०१७ | स्वयंप्रतिमा शोध अंतर्बाह्य प्रतिमेचा | मेधा विश्वास,<br>संजाली मुरगुडकर | ३३ |
| २९ जून २०१७ | हिंदू (पुस्तक समीक्षा) | शिरीष गोपाळ देशपांडे | १५ |
| २३ नोव्हेंबर २०१७ | सकारात्मक दृष्टीकोनातून जीवन समृद्धी | विजय जोशी | १५ |
| २१ डिसेंबर २०१७ | भीमरूपी महा मुद्रा | चंद्रशेखर ठाकूर | २२ |
| २२ फेब्रुवारी २०१८ | वर्तमान केंद्र सरकारच्या विकास योजना व फलश्रुती | प्रतिक कर्पे | १४ |

**गुरुवार सभेतील वरील कार्यक्रमांव्यतिरिक्त अन्य एक खालील कार्यक्रमही योजण्यात आला.**

| दिनांक | कार्यक्रमाचे नाव | वक्ते | सहभागी संख्या | स्थान |
|---|---|---|---|---|
| १४ जुलै २०१७ | व्याख्यानः जीएसटी समजून घेताना | जयंत सिन्हा, केंद्रीय राज्यमंत्री नागरी विमान वाहतूक | ६५० | ठाणे |

# ५. संशोधन

## वसंतराव पटवर्धन पाठ्यवृत्ती : कोकणातील बांबू लागवड

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ही संस्था प्रशिक्षण आणि प्रबोधन याबरोबरच संशोधनाच्या क्षेत्रात ही कार्यरत आहे. संशोधन, अध्ययन व समक्ष पाहणी पथके यांच्या माध्यमातून या क्षेत्रात काम केले जाते. तरुणांमधील अभ्यासू वृत्ती वाढावी आणि त्यांच्यातील संशोधक वृत्तीला एक आधार मिळावा म्हणून प्रबोधिनीने युवा पत्रकार व अभ्यासक यांच्यासाठी वास्तव दर्शन पाठ्यवृत्ती योजना सुरू केली. प्रामुख्याने सहा विभिन्न विषयांतील पाठ्यवृत्ती दर दोन वर्षांनी जाहीर करण्यात येतात. त्यांतील दोन पाठ्यवृत्ती तरुण पत्रकारांना व चार पाठ्यवृत्ती सर्वसाधारण गटांसाठी देण्यात येतात.

वसंतराव पटवर्धन पाठ्यवृत्ती ही कोकणातील विकास कामांशी संबंधित आर्थिक आणि सामाजिक विषयांकरिता देण्यात येते. मागील दोन वर्षापूर्वी कोकणातील बांबू लागवड या विषयाचा अभ्यास करण्यासाठी ही पाठ्यवृत्ती रघुनंदन वेलणकरांना देण्यात आली होती. ही पाठ्यवृत्ती डिसेंबर २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आली. या अभ्यासात त्यांना कोकणातील बांबू विषयातील तज्ज्ञ मिलिंद पाटील यांनी मार्गदर्शन केले आहे.

# ६.
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र ग्रंथालय

ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था असून वाचकांच्या, संशोधकांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना उपयोगी असणारे साहित्य उपलब्ध करून देणे, त्यांच्यासाठी एक कार्यक्षम यंत्रणा उभी करणे हे ग्रंथालयाचे महत्त्वाचे काम! आणि हेच महत्त्वाचे काम गेली २४ वर्षे प्रबोधिनीचे ग्रंथालय करत आहे. ग्रंथालयाचे रूपांतर ज्ञानकेंद्रात होण्यासाठी आवश्यक ती जाणीवजागृती करणे, ग्रंथालयाची उपक्रमशीलता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे, संगणक युगात वाचक केंद्री रचना आणि ग्रंथालय सेवा सक्षम करण्यासाठी योजना आखणे अशा विविध अंगांनी हे ग्रंथालय काम करत आहे. या ग्रंथालयाकडे विपुल ग्रंथसंपदा, विविध विषयांवरील पुस्तिका, वृत्तपत्रीय कात्रणे उपलब्ध आहेत. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील अभ्यासक या ग्रंथालयाचा लाभ घेत असतात. ग्रंथालयात मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतील ग्रंथांचा समावेश आहे.

**ग्रंथालयातील साहित्याची सद्यस्थिती खालीलप्रमाणे :**

| अ. क्र. | ग्रंथालयीन साहित्य प्रकार | नोंद साहित्य |
|---|---|---|
| १ | ग्रंथ (मराठी, हिंदी व इंग्रजी) | १५,४४६ |
| २ | पुस्तिका (विविध विषयांवरील संदर्भ पुस्तिका) | ३,५४९ |
| ३ | दुर्मीळ वृत्तपत्रीय कात्रणे | ९०,००० |
| ४ | ध्वनिफिती | ७०९ |
| ५ | चित्रफिती | २२७ |
| ६ | सीडीज (चक्रिका) | ७५२ |
| ७ | दुर्मीळ वृत्तपत्रे | ६३ |
| ८ | नकाशे | १२ |
| ९ | जर्नल्स | १,११० |

अहवाल वर्षात ग्रंथालयातर्फे ९ प्रबोधनात्मक व ७ इतर असे १६ सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले गेले. संवाद सभा, ग्रंथ प्रकाशन, वाचन प्रेरणा दिन, वृक्ष लागवड, मराठी भाषा दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व ग्रंथ प्रदर्शन इत्यादी उपक्रमांचा समावेश त्यांत होता. सदर उपक्रमांत माधव भांडारी, रघुनाथराव कुलकर्णी व गणेश खणकर यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली. ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई शहर जिल्ह्यात दि. १७ व १८ नोव्हेंबर २०१७ रोजी ग्रंथोत्सव २०१७ या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर दोन दिवसीय कार्यक्रमास प्रबोधिनीच्या ग्रंथालयाचे कर्मचारी उपस्थित होते. अनेक अत्याधुनिक सेवा-सुविधा असलेल्या या ग्रंथालयाला अनेक सन्माननीय व्यक्तींनी ग्रंथ भेट दिले आहेत. या सन्माननीय व्यक्तींमध्ये रोहिणी केळकर, दिलीप चावरे, सारंग दर्शने, वेदवती हब्बू, कमलाकर आंबेकर, प्रवीण बर्दापूरकर, राजीव जोशी, पंढरीनाथ केकरे, शशिकांत सावंत, श्रीकांत रांगणेकर, महेश बलदेवा, उज्वला पन्हाळे, प्रा. संजय देशमुख आणि योगेश पवार यांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, मुंबई शहर, वरळी यांच्याकडून दीनदयाळ उपाध्याय संपूर्ण वाङ्मय(हिंदी) याचे १५ खंड ग्रंथालयास देणगीदाखल प्राप्त झाले आहेत.

## ६.१
## निवासी संशोधन पाठ्यवृत्ती

अहवाल वर्षात पत्रकार सारंग दर्शने, अभिषेक चौधरी (दिल्ली), प्रा. हेमानी चानकर, महिमा नाईक व शांभवी थिटे यांनी या निवासी पाठ्यवृत्ती योजनेंतर्गत ग्रंथालयाचा लाभ घेतला.

## ६.२
## कर्मचारी विकास उपक्रम

दि. २९ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत सूचना एवं पुस्तकालय नेटवर्क केंद्र (INFLIBNET) गांधी नगर, गुजरातमार्फत घेण्यात आलेल्या "ट्रेनिंग प्रोग्रॅम ऑन सोल २.० सॉफ्टवेअर" या कार्यशाळेत ग्रंथपाल दिलीप नवेले यांनी सहभाग घेतला होता.

## ६.३
## सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा
### १६-१७ डिसेंबर २०१७

महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवनात सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान अनन्यसाधारण आहे. सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारीवृंदाच्या सहभागातून ग्रंथालये अधिक वाचककेंद्रित आणि आधुनिक होण्यासाठी दि. १६-१७ डिसेंबर २०१७ रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. ग्रंथालयांचे रुपांतर ज्ञानकेंद्रात होण्यासाठी आवश्यक जाणीवजागृती करणे, ग्रंथालयांची उपक्रमशीलता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आणि आधुनिकतेच्या काळात कर्मचाऱ्यांनी नवनवीन साधनांचा उपयोग करून स्वतःची व ग्रंथालयाची प्रगती करणे अशी या कार्यशाळेची उद्दिष्टे होती. व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशनचे मुख्यसंपादक दिनकर गांगल यांच्या शुभहस्ते या कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले.

या वेळी सेवानिवृत्त ग्रंथालय संचालक (महाराष्ट्र राज्य) डॉ. बा. ए. सनान्से उपस्थित होते. या कार्यशाळेत महाराष्ट्रातल्या १६ सार्वजनिक ग्रंथालयांतील २४ कर्मचारी सहभागी झाले होते. कार्यशाळेत एकूण सात विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. दिनकर गांगल, राजीव जोशी, डॉ. सुषमा पौडवाल, वेदवती हब्बू, हेमंत शेट्ये, डॉ. मीना शिलेदार आणि दिलीप मेस्त्री या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी अशी कार्यशाळा नियमित घेण्यात यावी. ग्रंथालय सेवा सक्षम करणे, ग्रंथालयाची उपक्रमशीलता वाढविणे आधुनिक तंत्राचा वापर करून लोकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करणे याबद्दल विशेष असे मार्गदर्शन मिळाले अशा प्रतिक्रिया सहभागींनी नोंदविल्या. समारोप सत्रात ग्रंथपाल दिलीप नवेले यांनी कार्यशाळेविषयी अभिप्राय जाणून घेतले व सर्व प्रतिनिधींना प्रमाणपत्र देऊन ही कार्यशाळा संपन्न झाली.

## भारतीय जनता पार्टी राजकारणात कशासाठी ?
### १० सप्टेंबर २०१७

# ७. पुस्तक प्रकाशन

भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शाह यांनी लिहिलेल्या भारतीय जनता पार्टी राजकारणात कशासाठी? या पुस्तिकेच्या मराठी, हिंदी व इंग्रजी आवृत्त्यांचा प्रकाशन समारंभ रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने रविवार दि. १० सप्टेंबर २०१७ रोजी पुण्यामधील बालगंधर्व रंगमंदिर येथे योजण्यात आला होता. या पुस्तिकेचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या वेळी केंद्रीय पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश बापट, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे, पुण्याच्या महापौर मुक्ता टिळक, भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष खा. विनय सहस्रबुद्धे, कार्यकारी संचालक रवींद्र साठे व भाजपचे पुणे शहराध्यक्ष योगेश गोगावले इत्यादी उपस्थित होते. सुमारे ५०० नागरिक या प्रकाशन समारंभाला उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, अमित शाह मागील काही दिवसांपासून संपूर्ण देशभरात प्रवास करत आहेत. अनेक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यासह समाजाच्या विविध क्षेत्रांत काम करणाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. या प्रवासादरम्यान त्यांनी जे काही विचार मांडले, त्या विचारांतून भाजपची भूमिका समाजासमोर आणण्याचा एक प्रयत्न केला. त्या संपूर्ण विचारांचे संकलन भारतीय जनता पार्टी राजकारणात कशासाठी या पुस्तिकेत आहे.

# ८. कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने २०१६ मध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC) यांच्याबरोबर केलेल्या करारानुसार कल्याण, कांदिवली व उत्तन येथे निरनिराळ्या विषयांची प्रशिक्षणे एप्रिल २०१७ पासून घेण्यास सुरुवात केली. एप्रिल ते सप्टेंबर २०१७ या कालावधीत पूर्ण झालेल्या प्रशिक्षणांची माहिती खालीलप्रमाणे :

## एप्रिल ते सप्टेंबर २०१७ या कालावधीत पूर्ण झालेल्या प्रशिक्षणांची माहिती खालीलप्रमाणे :

| क्रमांक | प्रशिक्षणाचा विषय | कालावधी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | असिस्टंट ब्युटी थेरपिस्ट | २ महिने | १२ |
| २ | असिस्टंट ब्युटी थेरपिस्ट | २ महिने | २८ |
| ३ | अकाउंटिंग | ४ महिने | १८ |
| ४ | डेंटल हायजीन असिस्टंट | २ महिने | ९ |
| ५ | सेल्फ एम्प्लॉईड टेलर | ३ महिने | ११ |

## ऑक्टोबर २०१७ ते जानेवारी २०१८ या कालखंडात पार पडलेल्या प्रशिक्षणांची स्थिती पुढील प्रमाणे :

| क्रमांक | प्रशिक्षणाचा विषय | कालावधी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | असिस्टंट ब्युटी थेरपिस्ट | २ महिने | १५ |
| २ | अकाउंटिंग | ४ महिने | ४४ |
| ३ | सेल्फ एम्प्लॉईड टेलर | ३ महिने | १५ |
| ४ | डेंटल हायजीन असिस्टंट | २ महिने | १५ |

तसेच उत्तन येथे 'Food Beverages : Steward' हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात आला. त्यात २० पैकी २० मुले उत्तीर्ण झाली व त्यांतील १० जणांना नोकरीसुद्धा देण्यात आली. कांदिवली येथे सुद्धा अशाच प्रकारचे अभ्यासक्रम, प्रशिक्षणे राबविण्यात आली. त्याची थोडक्यात माहिती खाली देत आहोत.

## कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

| क्रमांक | प्रशिक्षण कार्यक्रमाचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | असिस्टंट ब्युटी थेरपिस्ट | १०२ |
| २ | रांगोळी काढणे | २२ |
| ३ | अकाउंटिंग | २७ |
| ४ | मसाला बनवणे | ७८ |
| ५ | मेंदी चितारणे | २३ |
| ६ | केक बनवणे | २५ |



# १०.
# ज्ञान-नैपुण्य केंद्र

## ज्ञान-नैपुण्य केंद्र

उत्तन, भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे ज्ञान-नैपुण्य केंद्र ही प्रबोधिनीची मुख्य वास्तू आता प्रसिद्ध होत चालली आहे. व्यवसाय विश्वातील अनेक व्यावसायिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि अन्य सामाजिक संस्था या ज्ञान-नैपुण्य केंद्राच्या अंतर्गत मिळणाऱ्या सुविधांचा लाभ घेत आहेत. विमा, ऊर्जा, शिक्षण, अभियांत्रिकी, रसायन व व्यवस्थापन क्षेत्रांतील सल्लागार या संस्था यात प्रामुख्याने आघाडीवर आहेत. टाटा कन्सल्टिंग इंजिनिअर्स लि., बजाज इलेक्ट्रिकल्स लि., मुंबई एज्युकेशन ट्रस्ट, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा, पिडिलाईट इंडस्ट्रीज लि., अँकर इलेक्ट्रिकल्स लि., एस.बी.आय. लाईफ इन्शुरन्स कं. लि., मानस अँग्रो इंडस्ट्रीज अँड इन्फ्रास्ट्रक्चर लि., लक्ष्यवेध इन्स्टिट्यूट ऑफ लिडरशीप डेव्हलपमेंट, अस्पायर नेटवर्क प्रा. लि., बर्कलेज् बँक पी.एल.सी., कॅपिटल सिक्युरिटीज् लि., एक्साईड लाईफ इन्श्युरन्स कं. लि., सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, बॉम्बे चार्टर्ड अकाउंटन्टस् सोसायटी, इंटरनॅशनल सेंटर फॉर कल्चरल स्टडीज्, सराफ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, इंडिया मेमरी स्पोर्टस् काऊंन्सिल, प्रेशिया फार्मा इत्यादी संस्थांनी उत्कृष्ट प्रतिसाद देत ज्ञान-नैपुण्य केंद्राद्वारे दिल्या जाणाऱ्या सुविधांची प्रशंसा केली आहे. या अहवाल वर्षात दहा नवीन व्यावसायिक संस्था प्रबोधिनीच्या संकुलाशी जोडल्या गेल्या आहेत. सामाजिक संस्थांच्या क्षेत्रातील स्नेहा ट्रस्ट, सेवा सहयोग फाउंडेशन, टेक महिंद्रा फाउंडेशन, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, रोटरी क्लब मुंबई, अहिंसा परमो धर्म, प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, सातगाव ग्रामविकास प्रतिष्ठान, रेनबो रिट्रीट, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, आयुर्वेद व्यासपीठ, लक्ष्मी व्यंकटेश चॅरिटेबल अँड एज्युकेशनल ट्रस्ट, डॉ. दिलीपकुमार सामाजिक संस्था, ब्रम्हविद्या साधक संघ, प्रजा फाउंडेशन, स्पर्श ट्रस्ट या संस्थांनी आपली प्रशिक्षण शिबिरे या संकुलात आयोजित केली होती. या काळात नव्याने सात संस्था जोडल्या गेल्या. यशदा या शासकीय प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून नव्याने निवडून आलेल्या ग्राम पंचायत, जिल्हा परिषद सदस्य आणि सरपंच यांची प्रशिक्षण शिबिरे आठ विविध गटांमध्ये पार पडली. यात ३३५ प्रतिनिधी सहभागी झाले होते. याव्यतिरिक्त महाराष्ट्र शासनातर्फे वन विभाग, शिक्षण विभाग, माहिती आणि जनसंपर्क विभाग, राष्ट्रीय ग्राम विकास संस्थान (एन.आय.आर.डी.), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. या विभागांनीही आपली प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली होती. यात विविध विभागांचे मंत्री, सचिव आणि महासंचालक स्तरावरील अधिकारी यांनी प्रबोधिनीच्या या ज्ञान-नैपुण्य केंद्राच्या संकुलाला भेट दिली आहे.

## १०.१
## सरिता इमारत जीर्णोद्धार अनावरण

संकुलातील विविध एजन्सींत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी राहण्याची व्यवस्था व्हावी ह्या दृष्टीकोनातून सदर इमारतीची निर्मिती करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त भांडारगृह व वाहनचालक यांच्यासाठी राहण्याची व्यवस्थाही ह्या इमारतीमध्ये करण्यात आली आहे. ह्या इमारतीचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते दि. १३ मे २०१७ रोजी पार पडले. इमारतीच्या संदर्भातील माहिती मुख्य व्यवस्थापक - देखभाल उमेश मोरे यांनी सर्वांसमोर मांडली. या प्रसंगी वास्तुविशारद आरिफ नूरानी, प्रबोधिनीचे अधिकारी, कर्मचारी व भाईंदर-उत्तन परिसरातील कार्यकर्ते उपस्थित होते.

## १०.२
## खतनिर्मिती प्रकल्प

पर्यावरणाला पूरक व टाकाऊ पदार्थांचा पुनर्वापर करण्याच्या उद्देशातून बागेतील कचरा तसेच स्वयंपाक घरातील टाकाऊ पदार्थ यांपासून खतनिर्मितीचा प्रकल्प संकुलामध्ये ऑगस्ट २०१७ मध्ये सुरू करण्यात आला. सदर प्रकल्पातून खतनिर्मिती सुरू झाली असून या खताचा वापर संकुलातील बागेसाठी होत आहे. प्रकल्पाचे काम त्रिमूर्ती टेक्नॉलॉजिज प्रा. लि. या कंपनीने केले आहे. बागकाम विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रकल्प हाताळणीसाठी प्रशिक्षित करण्यात आले आहे.

# ११. संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र, पुणे

संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्राद्वारे एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या दरम्यान आयोजित विविध कार्यशाळा, प्रशिक्षण आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम यांची माहिती पुढीलप्रमाणे...

## ११.१
## महिला बचत गट व उद्योजकता विकास कार्यशाळा

उद्योजकता विकास या कार्यक्रमात महिला बचत गटातील उद्योजिकांचा, यामध्ये कार्य करणाऱ्या प्रतिनिधींचा आणि संस्थांचा विचार करून महिला बचत गट आणि उद्योजकता विकास या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. १७ व १८ जून २०१७ रोजी पुणे येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये बचतगट, स्वयंरोजगार व उद्योजकता यांचा परस्पर संबंध, बचतगटांचा प्रवास, आव्हाने आणि संधी, कामकाजाचे व्यवस्थापन व अहवाल लेखन, बाजारपेठ सर्वेक्षण व उद्योगातील संधींचे शोधन, विविध शासकीय योजना, उत्पादनाची जाहिरात व प्रसिद्धी, जनसंपर्क आणि उद्योगातील मूल्यनिर्धारण व अंदाजपत्रक या विविध विषयांवर अनुक्रमे सुवर्णा गोखले, स्वाती महाळंक, मनीष पुराणिक, सरिता पाठक, प्रकाश भोंगे, श्याम भुर्के, मिलिंद संपगावकर या तज्ज्ञ व अनुभवी वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

ज्ञानेश्वर बोडके या यशस्वी उद्योजकाचे अनुभव कथन करणारी तसेच सहभागींना प्रेरणादायी अशी मुलाखतही घेण्यात आली होती. गटचर्चेद्वारे व गटकार्याद्वारे कार्यशाळा सहभागात्मक करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये पुणे,लातूर,नांदेड,औरंगाबाद, कोल्हापूर या जिल्ह्यांतील नऊ महिला व एक पुरुष प्रतिनिधी अशा दहा व्यक्ती उपस्थित होत्या.

## ११.२
## संस्थेचे प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळा

अमरावती येथील जनकल्याण सेवा संस्थेच्या सहयोगाने अमरावती व परिसरातील स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासाठी संस्थेचे प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापन या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. २४ व २५ जून २०१७ रोजी अमरावती येथे करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन जनकल्याण सेवा संस्थेचे अध्यक्ष घनश्याम ककरानिया व श्रीसंत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलचे डॉ. अनिल सावरकर यांनी केले.

या कार्यशाळेमध्ये संस्थेच्या विश्वस्तांची भूमिका आणि जबाबदारी, संस्थेचे व्हिजन-मिशन, जनसंपर्काचे महत्व, निधी संकलन, निधी व्यवस्थापन, संस्थेचे लेखापरीक्षण, हिशोब लेखन आणि सी.एस.आर. या विषयांवर सर्वश्री विवेक अत्रे, मनीष पुराणिक, श्रीराम पटवर्धन या तज्ज्ञ व अनुभवी वक्त्यांनी अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन केले. जनकल्याण सेवा संस्थेच्या डॉ. हेडगेवार आयुर्विज्ञान व अनुसंधान

संस्थेसह,प्रज्ञा प्रबोधिनी,श्री समर्थ शिक्षण संस्था, मुरके हॉस्पिटल, विश्व मांगल्य ट्रस्ट व संपूर्ण बांबू केंद्र अशा एकूण सहा संस्थांच्या प्रतिनिधींनी या कार्यशाळेस हजेरी लावली. २२ महिलांसह एकूण ५८ प्रतिनिधी या कार्यशाळेत पूर्ण वेळ सहभागी झाले होते.

## ११.३
## द शो मस्ट गो ऑन
### १५ जुलै २०१७

भा.ज.पा. चित्रपट कामगार आघाडी (महाराष्ट्र प्रदेश) या संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये व पदाधिकाऱ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि संघटन कौशल्य विकसित होण्यासाठी तसेच त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती ज्ञात होण्यासाठी दि. १५ जुलै २०१७ रोजी द शो मस्ट गो ऑन या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन पुणे शहरातील पत्रकार भवनाच्या सभागृहामध्ये करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन संघटनेचे अध्यक्ष गोरक्ष धोत्रे, उपाध्यक्षा डॉ. प्रिती व्हिक्टर व अन्य पदाधिकारी तसेच प्रबोधिनीचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी मनीष पुराणिक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. कार्यशाळेच्या प्रथम सत्रामध्ये मनीष पुराणिक यांनी मार्गदर्शन केले. यानंतरच्या सत्रामध्ये विनय पत्राळे यांनी नेतृत्वगुण संवर्धन आणि संघटन कौशल्य या विषयावर मार्मिक शैलीमध्ये आणि सहभागात्मक पद्धतीने उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या उत्तरार्धामध्ये चित्रपट कामगारांसाठीच्या शासनाच्या विविध योजना तसेच संतुलित जीवनशैली या विषयांवर अनुक्रमे मनीष पुराणिक आणि डॉ. प्रिती व्हिक्टर यांनी मार्गदर्शन केले. मराठी चित्रपट व मालिका यांमधून काम करणारे ४० हून अधिक महिला व पुरुष अभिनेते, तंत्रज्ञ व इतर कर्मचारी या कार्यशाळेमध्ये उपस्थित होते.

## ११.४
## नेतृत्व विकास कार्यशाळा
### ऑगस्ट–सप्टेंबर–ऑक्टोबर २०१७

कोणत्याही क्षेत्रामध्ये उद्याचे नेतृत्व करायचे असल्यास स्वत:ची तयारी करण्यासाठी नेतृत्व कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य व नियोजन कौशल्य ही कौशल्ये यावीत या उद्देशाने विविध क्षेत्रांतील व्यक्तींसाठी २३ चर्चासत्रांच्या (एकूण ६ दिवसांच्या) नेतृत्व विकास कार्यशाळेचे आयोजन पुणे येथे करण्यात आले होते. ही कार्यशाळा ऑगस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर अशा तीन महिन्यांमध्ये विभागली होती. या कार्यशाळेच्या पहिल्या भागाचे आयोजन दि. १९ व २० ऑगस्ट २०१७ रोजी करण्यात आले होते. प्रसिद्ध अभिनेत्री दीपा लागू आणि त्यांच्या सहकारी यशोधरा भालेराव यांनी एकत्रितपणे कार्यशाळेचा आरंभ केला. डॉ. राम साठ्ये, नितीन महाडिक, डॉ. भूषण केळकर आणि श्याम भुर्के यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या भागाचे आयोजन दि. १६ व १७ सप्टेंबर २०१७ रोजी करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या या भागामध्ये “मी व माझे सहकारी” या संबंधित विषयांचे आयोजन केले होते. डॉ. अरुणा कुलकर्णी, स्वाती महाळंक, अनया निसळ, डॉ. दीपक गुप्ते, डॉ. अजित आपटे आणि महेंद्र सेठिया या वक्त्यांनी रोल प्ले आणि कृती कार्यक्रमांद्वारे विविध समाज घटकांतील चपखल अशा उदाहरणांसह विषयाचे आकलन करून दिले. कार्यशाळेच्या तिसऱ्या भागाचे आयोजन दि. १४ व १५ ऑक्टोबर २०१७ रोजी करण्यात आले होते. हा भाग समाज व समाजभान यासंबंधित होता. डॉ. अनघा लवळेकर, विवेक वेलणकर, शर्मिला ओसवाल, प्रमोद कुलकर्णी, दिलीप कुलकर्णी आणि श्याम भुर्के अशा त्या त्या क्षेत्रांतील अनुभवी व अभ्यासू वक्त्यांनी मार्गदर्शन केले. श्याम भुर्के यांनी कार्यशाळेचा समारोप केला. त्यांच्याच हस्ते सर्व सहभागींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. नेतृत्व विकास कार्यशाळेमध्ये पुणे, मुंबई, परभणी, चंद्रपूर, सांगली, सोलापूर, अहमदनगर, उस्मानाबाद आणि रायगड या जिल्ह्यांमधून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक इत्यादी क्षेत्रांतील कर्मचारी, स्वयंसेवी व शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक, मुख्याध्यापक, डॉक्टर, वकील, राजकीय कार्यकर्ते, आमदारांचे स्वीय साहाय्यक, ग्रामपंचायत सरपंच, महाविद्यालयीन विद्यार्थी इत्यादी असे एकूण ४४ जण सहभागी झाले होते.

## ११.५
## स्वयंसेवी संस्थांसाठी – सी.एस.आर. कार्यशाळा
### ३०–३१ डिसेंबर २०१७
### आणि ३–४ फेब्रुवारी २०१८

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र यांच्यातर्फे स्वयंसेवी संस्थांसाठी

सी.एस.आर. कार्यशाळेचे आयोजन अनुक्रमे दि. ३०-३१ डिसेंबर २०१७ आणि ३-४ फेब्रुवारी २०१८ रोजी पुणे येथे करण्यात आले होते. महाराष्ट्रातील अनेक स्वयंसेवी संस्थांनी या कार्यशाळेसाठी नोंदणी केली होती. त्यामुळे या कार्यशाळेचे आयोजन दोन तुकड्यांमध्ये करण्यात आले होते. सी.एस.आर.च्या माध्यमातून संस्थेच्या कार्यासाठी निधी उपलब्ध करणे, त्याची पूर्वतयारी करणे, निधी मिळण्यासाठी आवश्यक पात्रता, निकष आणि विविध कागदपत्रांची पूर्तता करणे यासंबंधी विविध स्वयंसेवी संस्थांना मार्गदर्शन करणे, तसेच संस्थांच्या प्रतिनिधींना त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वात आवश्यक सी.एस.आर. निधी उपलब्ध करून घेता येतो हा आत्मविश्वास त्यांना देणे या उद्देशांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून सी.एस.आर., उद्योग आणि स्वयंसेवी संस्था क्षेत्रांतील तज्ज्ञ व अनुभवी वक्ते अनिल वळसंगकर, प्रशांत महामुनी, उमा पानसे, विवेक अत्रे, शिरीष तेरखेडकर, शैलेश घाटपांडे, योगिता आपटे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत कंपनीचा सी.एस.आर. मॅनेजर आणि संस्था प्रतिनिधी अशा दोघांमधील संवादाचे सादरीकरण (रोल प्लेद्वारे) करण्यास सांगण्यात आले. त्या आधारे संस्थांनी कमी वेळेमध्ये आपल्या प्रकल्पाबाबत नेमकेपणाने माहिती कशी सांगावी याचे प्रात्याक्षिक दाखवण्यात आले. प्रकल्प प्रस्तावाबाबतच्या सर्व संकल्पना स्पष्ट झाल्याचा अभिप्रायही या कार्यशाळेबाबत सहभागींकडून मिळाला. कार्यशाळेच्या दोन्ही तुकड्यांमध्ये रायगड, औरंगाबाद, अकोला, सोलापूर, ठाणे, परभणी, सिंधुदुर्ग, यवतमाळ, नागपूर, वर्धा, बीड, नाशिक, उस्मानाबाद, अहमदनगर, कोल्हापूर, पुणे, सांगली, अमरावती, नांदेड, मुंबई, जालना आणि रत्नागिरी या जिल्ह्यांतील विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे ४३+४८ असे एकूण ९१ प्रतिनिधी उपस्थित होते.

## ११.६
## स्पर्धा परीक्षेच्या (एम.पी.एस.सी-यु.पी.एस.सी) विद्यार्थ्यांसाठी प्रशासकीय नेतृत्वविकास - संवाद
### ४ मार्च २०१८

स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांच्या मनामध्ये चालू राजकीय व सामाजिक घडामोडी, भारतीय संविधान, भारताचा आर्थिक-सामाजिक विकास, अर्थव्यवस्था इत्यादी अनेक विषयांचे सूक्ष्म वाचन, विश्लेषण या विद्यार्थ्यांना करावे लागते. सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेतील विषयाबाबतच्या संकल्पना स्पष्ट करणे आणि मुलाखतीच्या तयारीच्या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे या उद्देशांनी स्पर्धा परीक्षेच्या (एम.पी.एस.सी-यु.पी.एस.सी) विद्यार्थ्यांसाठी प्रशासकीय नेतृत्वविकास या संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने पुण्यातील पत्रकार भवन येथे रविवार दि. ४ मार्च २०१८ रोजी करण्यात आले होते.

शासनाच्या महत्त्वपूर्ण योजना व शासनाची धोरणे तसेच संसदेमध्ये संमत केलेले कायदे यांविषयी केंद्र सरकारमधीलच एका जबाबदार अभ्यासू व्यक्तीने विद्यार्थ्यांना सांगणे हेच या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य मानून या संवादात्मक कार्यक्रमामध्ये रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष आणि भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष खा. डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी महाराष्ट्राच्या विविध भागांतील एम.पी.एस.सी-यु.पी.एस.सी च्या सुमारे २५० विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. याप्रसंगी डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी केंद्र शासनाच्या अनेक कल्याणकारी योजनांची माहिती सांगत नोकरी ऐवजी रोजगाराचा विचार करावा तसेच व्यवसायाच्या नव्या संधी शोधत उद्योजकतेची कास धरावी असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. प्रशासकीय यंत्रणा सक्षम, सचोटीची, कायद्याच्या कक्षेनुसार वावरणारी अशा अर्थाने बळकट व्हावी असे प्रतिपादनही विनयजींनी केले.

## ११.७
## राजकीय कार्यकर्त्यांसाठी सोशल मीडिया - कार्यशाळा
### १०-११ मार्च २०१८

राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना सोशल मीडियाबाबत आवश्यक प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्राच्या वतीने शनिवार-रविवार दि. १०-११ मार्च २०१८ रोजी पुणे येथे राजकीय कार्यकर्त्यांसाठी - सोशल मीडिया या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या पहिल्या व दुसऱ्या सत्रांमध्ये माध्यम क्षेत्रातील अनुभवी पत्रकार, निवेदिका, लेखिका स्वाती महाळंक, प्रा. क्षितिज पाटुकले यांनी अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन केले. सोशल मीडियावर नेमके काय व कसे लिहायचे याविषयी भाऊ तोरसेकर यांनी तर सोशल मीडियावर पक्षाचा प्रचार करत असताना त्याचे धोरणात्मक नियोजन कसे करावे हे शैलेंद्र महाजन यांनी

त्यांच्या व्यावसायिक व राजकीय क्षेत्रातील अनेक वर्षांच्या अनुभवांद्वारे समजावून सांगितले. यानंतर प्रसिद्ध सायबर गुन्हे अन्वेषक संदीप गादिया यांनी सोशल मीडिया व सायबर कायदा याविषयी अत्यंत मौलिक मार्गदर्शन केले. सोशल मीडिया वरील कृती सरावही या कार्यशाळेमध्ये करण्यात आला. या सत्रामध्ये प्रतीक धात्रक यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले. राजकीय पक्षाच्या सोशल मीडियाची टीम डेव्हलप कशी करावी या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळेच्या शेवटच्या सत्रामध्ये प्रीती गांधी यांना निमंत्रित करण्यात आले होते.

या कार्यशाळेमध्ये महाराष्ट्रातील जळगाव, सांगली, यवतमाळ, बुलढाणा, सोलापूर, कोल्हापूर, खामगाव, रायगड, अहमदनगर, पुणे, मुंबई आणि ठाणे या ठिकाणांहून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, भारतीय जनता पार्टी या राजकीय पक्षांतील ४७ कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

## ११.८
## शिवसेना, पुणे शहर, पदाधिकारी प्रशिक्षण शिबिर
### १७ मार्च २०१८

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने २०१९ मधील निवडणुकीच्या दृष्टीने लोकप्रतिनिधींच्या प्रचारातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शिवसेना तसेच पुणे शहरातील सुमारे ३५० पुरुष व महिला पदाधिकारी व कार्यकर्ते यांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन शनिवार दि. १७ मार्च २०१८ रोजी पुणे येथे करण्यात आले होते. शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन केले. या शिबिराच्या पहिल्या सत्रामध्ये डॉ. अरुणा कौलगुड यांनी संघटन कौशल्य या विषयावर सर्व सहभागींबरोबर संवाद साधला. दुसऱ्या सत्रामध्ये दीपक जाधव यांनी बूथ व्यवस्थापन व निवडणूक व्यवस्थापन हा विषय मांडला.

तिसऱ्या सत्रामध्ये अजित जोशी यांनी भाषणकला या विषयावर कार्यकर्त्यांशी संवाद साधला. तसेच प्रचाराच्या किंवा सभेच्या वेळेस भाषण करणाऱ्याला समयसूचकता असायला हवी हेही सूचित केले. या सत्राच्या शेवटी काही कार्यकर्त्यांना तसेच पदाधिकाऱ्यांना मंचावर बोलावून त्यांच्याकडून दोन-तीन मिनिटे भाषण करण्याचा सराव करवून घेतला. शिवसेना पुणे शहर प्रमुख चंद्रकांत मोकाटे यांच्या मार्गदर्शनाने या प्रशिक्षण शिबिराचा समारोप झाला.

**रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्राद्वारे आयोजित प्रबोधनात्मक कार्यक्रम (२०१७-१८)**

| क्रमांक | कार्यक्रम दिनांक | कार्यक्रमाचे नाव/विषय | वक्ते | सहभागी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २० मे २०१७ | संतुलित जीवनशैली - तंत्र आणि मंत्र | डॉ. प्रिती व्हिक्टर | १२ |
| २ | ८ जुलै २०१७ | समाजमाध्यमांचा विवेकी वापर | डॉ. अविनाश जोशी | ३५ |

## १२. आर. एम. पी. इंटरनॅशनल

## अरब देशांतील ज्यू निर्वासित आणि भारतात निर्वासित म्हणून राहावे लागलेल्या समुदायांशी असलेली त्यांची समानता – चर्चासत्र

**५ डिसेंबर २०१७**

३० नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या ज्यूईश निर्वासित दिवसाच्या निमित्ताने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचा आंतरराष्ट्रीय विभाग (आर.एम.पी. इंटरनॅशनल) आणि इंडो-इस्रायल फ्रेंडशिप असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अरब देशांतील ज्यू निर्वासित आणि भारतात निर्वासित म्हणून राहावे लागलेल्या समुदायांशी असलेली त्यांची समानता या विषयावर एका चर्चासत्राचे आयोजन दि. ५ डिसेंबर रोजी प्रबोधिनीच्या मुंबईतील वडाळा येथील कार्यालयात करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इस्रायलचे मुंबईतील महावाणिज्यदूत याकोव फिंकलष्टाईन उपस्थित होते. मुख्य वक्ते म्हणून इस्रायलच्या परराष्ट्र मंत्रालयातून वरिष्ठ राजदूत म्हणून निवृत्त झालेले इव्ही गाबे खास इस्रायलहून आले होते. चेंबूरच्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विश्वस्त महेश तेजवानी यांनी सिंधी निर्वासितांची, उद्योजिका शक्ती मुन्शी यांनी काश्मिरी पंडितांची, आणि ज्येष्ठ वकील रमेश मुधोळकर यांनी बांगलादेशी हिंदूंची कथा आणि व्यथा सांगितली.

२९ नोव्हेंबर १९४७ रोजी संयुक्त राष्ट्रांनी पॅलेस्टाइनच्या ज्यू आणि अरब देशांत विभाजनाचा ठराव केल्यानंतर उसळलेल्या हिंसाचारात अरब देश आणि इराण यांमध्ये सुमारे २००० वर्षे राहणाऱ्या सुमारे १० लाख ज्यूंना राहत्या वस्त्रानिशी घरदार सोडून यावे लागले. महेश तेजवानी यांनी सिंधी निर्वासितांची व्यथा मांडताना सांगितले की, फाळणीच्या वेळी पंजाब आणि बंगाल प्रांताचे विभाजन झाले असले, तरी सिंध प्रांत संपूर्णतः पाकिस्तानात गेल्यामुळे सिंधी लोकांना भारतात मिळेल तिथे आसरा घ्यावा लागला. शक्ती मुन्शी यांनी काश्मीरमधील इस्लामचे आगमन, तेथील पंडितांचे झालेले शोषण, फाळणीनंतरही जम्मू आणि लडाख या राज्यांतील बुद्ध आणि हिंदू यांना काश्मीर खोऱ्याकडून सहन करावा लागलेला सावत्रभाव, १९८९ साली दहशतवाद्यांच्या धमक्यांमुळे पंडितांवर निर्वासित व्हायची आलेली वेळ, ज्येष्ठ आणि मुलं यांना त्यातून बसलेला धक्का आणि आजही काश्मीर खोऱ्यातील लोकांकडून आपणच खरे शोषित असल्याचा केला जाणारा कांगावा यांचे भावस्पर्शी वर्णन केले. ॲड. मुधोळकर यांनी इंडोनेशिया, मलेशिया आणि बांगलादेश यांतील हिंदू अल्पसंख्याकांच्या स्थितीचे वर्णन केले. बांगलादेशात राहणाऱ्या हिंदूंना भारत-पाकिस्तानातील प्रत्येक युद्धाची तसेच भारतात होणाऱ्या दंग्यांची मोठी किंमत चुकवावी लागल्याचे सांगितले. बांगलादेशात कुठलेही सरकार असले, तरी तेथील हिंदुंच्या परिस्थितीत फारसा फरक पडत नसल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय विषयावर अभ्यास करणारे व अन्य अशा २२ जणांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या शेवटी आपल्या सर्वांच्या व्यथा एक समान असून त्यांबाबत जागतिक पातळीवर अधिक प्रमाणात जागरुकता निर्माण करण्यासाठी आपण एकत्र यायची गरज असल्याचे उपस्थितांचे एकमत झाले. अनय जोगळेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# १३. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, दिल्ली

## १३.१
## स्मार्ट इंडिया हॅकेथॉन - २०१७
## १-२ एप्रिल २०१७

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०१७ चे आयोजन १ आणि २ एप्रिल २०१७ या कालावधीत केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी डिजिटल साक्षरतेबाबत तरुणांना आवाहन करताना सांगितले होते की, देशाच्या प्रगतीत प्रत्येक नागरिकाला सामावून घ्यायचे असेल, तर डिजिटल माध्यमांच्या वापराबाबतची सर्वसामान्य नागरिकांची अनास्था आणि भीती दूर केली पाहिजे. त्याकरता अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन सातत्याने केले पाहिजे. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत प्रबोधिनीच्या वतीने जगातील सर्वांत मोठ्या वेबमेळ्याचे (हॅकेथॉनचे) आयोजन करण्यात आले होते. तंत्रज्ञानाचे महत्त्व, संशोधन आणि त्याचे फायदे यांची माहिती लोकांना करून देण्यासाठी डिजिटल तंत्राचा योग्य वापर करून ज्ञानाचे रूपांतर कौशल्यात करण्यासाठी कौशल्य आणि ज्ञान आवश्यक आहे हे पंतप्रधान मोदींनी या प्रसंगी ट्विटरद्वारे म्हटले. या वेबमेळ्यात (हॅकेथॉन) देशभरातील ३२ विविध ठिकाणच्या संस्थांमधून १५० नेटकऱ्यांनी सहभाग घेतला होता.

## १३.२
## बदलता भारत परिसंवाद

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने बदलता भारत या विषयावर अनेक परिसंवाद या अहवाल वर्षात आयोजित केले. या साखळीतील चौथा परिसंवाद दि. २८ एप्रिल २०१७ रोजी दिल्लीतील कॉन्स्टिट्युशन क्लब ऑफ इंडियाच्या सभागृहात योजण्यात आला होता. केंद्र सरकारचे पूर्वोत्तर भारत विकास विभागाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित होते तर प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. केंद्रातील मोदी सरकारच्या ऍक्ट इस्ट पॉलिसी अंतर्गत आमूलाग्र बदल घडत आहेत. त्यामुळे पूर्वोत्तर राज्यांत वेगाने विकास होत आहे असे डॉ. सिंग यांनी आपल्या उद्घाटनाच्या भाषणात म्हटले. पूर्वोत्तर भारतातील सातही राज्यांत शिक्षण, रोजगार आणि व्यवसाय यांबाबत राष्ट्रीय पातळीवर जनजागृती होणे गरजेचे आहे असेही त्यांनी म्हटले. विविध शिक्षण संस्थांचे ३० प्रतिनिधी या परिसंवादात सहभागी झाले होते.

या साखळीतील पाचवा परिसंवाद दि. २८ जून २०१७ रोजी दिल्लीतच कॉन्स्टिट्युशन क्लब ऑफ इंडियाच्या सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री जयंत सिन्हा यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष आणि खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे उपस्थित होते. मोदी सरकारच्या काळात नवनवीन संकल्पानांचा व्यावसायिक स्तरावर वापर करत विमान वाहतुकीच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा आलेख जयंत सिन्हा यांनी उपस्थितांसमोर ठेवला. या कार्यक्रमाला विविध संस्थांचे ७० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते.

सहावा परिसंवाद दि. २६ जुलै २०१७ रोजी दिल्लीतील तीन मूर्ती भवनमधील नेहरू म्युझियम मेमोरिअल लायब्ररी येथे पब्लिक पॉलिसी रिसर्च सेंटरचे डॉ. सुमित भसीन यांच्या अध्यक्षतेखाली योजण्यात आला होता. हैदराबादच्या एसीआयसी मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. एम. श्रीनिवास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रातील विविध संस्थांचे मान्यवर व विद्यार्थी असे ६० जण सहभागी झाले होते.

सातवा परिसंवाद दि. ३ मार्च २०१८ रोजी दिल्लीतील कॉन्स्टिट्युशन क्लब ऑफ इंडियाच्या सभागृहात योजण्यात आला होता. अरब योग फाउंडेशनच्या संस्थापिका पद्मश्री श्रीमती नौफ मारवाई या प्रमुख वक्त्या या नात्याने तर प्रबोधिनीचे उपाध्यक्ष आणि खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे अध्यक्ष या नात्याने उपस्थित होते. भारतीय संस्कृतीच्या परंपरेतील योग आणि निसर्गोपचार या क्षेत्रांत गेली १९ वर्षे काम करणाऱ्या मारवाई यांचा सौदी अरेबियात योग या विषयाला राजकीय मान्यता मिळवून देण्यात सिंहाचा वाटा आहे. या विषयात भारतीय संस्कृतीच्या प्रशंसक या नात्याने त्या परिषदेत आल्या होत्या. या कार्यक्रमाला समाजशास्त्राचे अभ्यासक, वैद्यकीय क्षेत्रातले आणि प्रसार माध्यमांच्या क्षेत्रातले धुरीण अशा ५०हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता.

## १३.३
## नेतृत्व साधना
### ६ ते १० जून २०१७

२०१७-१८ च्या अहवाल वर्षात प्रबोधिनीने नेतृत्व साधनाची तीन वेगवेगळी प्रशिक्षण शिबिरे यशस्वीपणे योजली होती. त्यांतील पहिले म्हणजे नेतृत्व साधनेच्या शृंखलेतील नेतृत्व साधना - ७ यंदाच्या वर्षी ६ ते १० जून २०१७ या कालावधीत पंचकुला, हरयाणा येथे संपन्न झाले. या प्रशिक्षणाचा मूळ उद्देश हा तरुणांच्या मनामध्ये सामाजिक आणि राजकीय नेतृत्वाची प्राथमिक संकल्पना बिंबवणे हा आहे. हरयाणातील तरुणांना संधी मिळावी या हेतूने या नेतृत्व साधनेचे प्रशिक्षण हरयाणात देण्याचे म्हाळगी प्रबोधिनीने ठरविले होते. पाच दिवसांच्या या निवासी प्रशिक्षण शिबिरात एकूण २५ सत्रे साकारली. यात ३० तरुण सहभागी झाले होते. त्यात विशेषत्वाने सामाजिक राजकीय नेत्यांनी, अभ्यासकांनी आणि प्रशिक्षकांनी डाव्यांचा माओवाद, निवडणूक व्यवस्थापन, परराष्ट्र धोरण, भारतीय घटना, अंतर्गत सुरक्षा, विकासाचे राजकारण आणि सामाजिक संस्था, बेटी बचाओ, बेटी पढाओ, राजकीय ॲक्टीविझम, माध्यम व्यवस्थापन, चिंतनशील आंतरराष्ट्रीय राजकारण, सुशासनाचे राजकारण, सामाजिक समस्यांची ओळख या विषयांवर प्रामुख्याने मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन हरयाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या हस्ते झाले. कप्तानसिंग सोलंकी, हरयाणाचे राज्यपाल, हरयाणाच्या पर्यटन विकास महामंडळाचे अध्यक्ष जगदीश चोप्रा, प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खा. डॉ. विनय सहस्रबुद्धे, कार्यकारी संचालक रवींद्र साठे, प्रा. सुषमा यादव, डॉ. राजीव नयन, नितीन गोखले आणि संतोष गुप्ता या प्रभुतींनी सहभागींना मार्गदर्शन केले.

नेतृत्व साधना - ८ हे प्रशिक्षण शिबिर दि. २७ जून ते १ जुलै २०१७ या कालावधीत गुवाहाटी येथे साकारण्यात आले. नेतृत्व साधना या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आठव्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन आसामचे मुख्यमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी केले. आसामचे सांस्कृतिक राज्यमंत्री नबाकुमार डोल्ये, डॉ. विनय सहस्रबुद्धे, रवींद्र साठे हे या वेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचा समारोप आसामचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या प्रशिक्षण शिबिरात इंद्राणी तहबीलदार, राजीव नयन, संतोष गुप्ता, हितेश बाजपेयी, मुकुंद बिहारी यांनी विविध सत्रे साकारली. या प्रशिक्षण वर्गात शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यास करणारे, राजकीय सामाजिक क्षेत्राची पार्श्वभूमी असणारे ३० तरुण सहभागी झाले होते.

## १३.४
## न्यू इंडिया व्हिजन २०२०
### १५ ते १७ सप्टेंबर २०१७

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या दिल्ली कार्यालयाच्या वतीने न्यू इंडिया व्हिजन २०२० हे प्रशिक्षण शिबिर दि. १५ ते १७ सप्टेंबर २०१७ या कालावधीत पोर्ट ब्लेअर, अंदमान येथे योजण्यात आले होते. तीन दिवसांच्या या निवासी प्रशिक्षण शिबिरात देशाच्या विविध प्रदेशांतून शिक्षण व राजकीय क्षेत्रांतील नेतृत्व साधनेच्या मागील ८ सत्रात सहभागी झालेले ३० तरुण या प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाले होते. या प्रशिक्षण शिबिरात शिक्षण, आरोग्य, दळणवळण, माहिती आणि दळणवळण, तंत्रज्ञान, उत्पादन, पायाभूत सुविधा, नैसर्गिक अधिवास, निसर्ग, ऊर्जा, पाणी, अन्न आणि शेती, वैद्यकीय शास्त्र आणि आरोग्य सेवा या विषयांवर गरिबी, भ्रष्टाचार, जातिवाद, सांप्रदायिकता, दहशतवाद आणि अस्वच्छता या सहा वेगवेगळ्या दृष्टीक्षेपांतून सहा गटांद्वारे विचारमंथन झाले.

या शिबिराचे उद्घाटन अंदमान निकोबार बेटाचे राज्यपाल

डॉ. जगदीश मुखी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या वेळी म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे उपस्थित होते. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष आणि खासदार विनय सहस्रबुद्धे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या शिबिरातील सहभागींना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. या शिबिराचा समारोप अंदमान निकोबारचे खासदार विष्णुपद रॉय यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या वेळी सहभागींनी सेल्युलर जेल येथे सावरकर स्मारकाला भेट दिली.

## १३.५
## बदलता पूर्वोत्तर भारत : राष्ट्रीय परिषद
### १४-१५ ऑक्टोबर २०१७

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि हिमालयीन विद्यापीठ या दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दिल्लीच्या फ्रेन्डस् कॉलनी परिसरातील सूर्या हॉटेल येथे दि. १४ आणि १५ ऑक्टोबर २०१७ या कालावधीत बदलता पूर्वोत्तर भारत या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत अनेक सन्माननीय मान्यवर वक्ता या नात्याने उपस्थित राहिले. त्यात प्रामुख्याने अरुणाचल प्रदेशचे राज्यपाल ब्रिगेडिअर (निवृत्त) डॉ. बी. डी. मिश्रा, नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग, प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे, आय.सी.एस.एस.आर.चे अध्यक्ष ब्रजबिहारी कुमार यांचा सहभाग होता.

शिवाय शिलाँग टाइम्सच्या पॅट्रिका मुखीम, माय होम इंडियाचे संस्थापक सुनील देवधर, गुवाहटी विद्यापीठाचे कुलगुरू मृदुल हजारिका, नॉर्थ इस्टर्न काउन्सिलचे सदस्य चंद्रकांता दास आणि ऑलिम्पीक बॉक्सर खासदार मेरी कोम यांनी या परिषदेत विविध सत्रांत मार्गदर्शन केले. मोदी सरकारच्या अ‍ॅक्ट इस्ट पॉलिसी या तत्त्वाला आधारभूत ठेवून या परिषदेत विचारमंथन करण्यात आले. या परिषदेत विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, राजकीय आणि वृत्तपत्र माध्यमांचे प्रतिनिधी असे १०० कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## १३.६
## केंद्र सरकार आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी प्रकल्प सामंजस्य करार

यंदाच्या अहवाल वर्षातील केंद्र सरकारच्या विविध विभागांसोबत म्हाळगी प्रबोधिनीने सामंजस्य करार केले आहेत ते पुढीलप्रमाणे...

**राष्ट्रीय बालहक्क आयोगासाठी शोध प्रकल्प**
बालकांसोबत होणारे गैरप्रकार आणि याबाबतची असणारी संवेदनशीलता या विषयावर आश्रमशाळा आणि बालसुधारगृहामध्ये जाऊन अभ्यास करण्यासाठी शोध प्रकल्प राबविण्याबाबतचा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

**हरयाणा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेसोबत सामंजस्य करार**
रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि हरयाणा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था या दोन संस्थांमध्ये प्रशिक्षण आणि क्षमता विकास कार्यक्रम एकत्रित राबवण्याबाबत बोलणी झाली व लवकरच सामंजस्य करार करण्यात येईल. या कराराच्या कार्यवाहीसाठी म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने कार्यकारी संचालक आणि हरयाणा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेचे प्रशासक हे महाराष्ट्रातील यशदा संस्थेसोबत कार्यक्रम राबविण्याची योजना तयार करीत आहेत.

**नानाजी देशमुख जन्मशताब्दी वर्षानिमित्त ग्रामविकास मंत्रालयासोबत कार्यक्रम**
नानाजी देशमुख जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने केंद्र सरकारच्या ग्रामविकास मंत्रालयासोबत म्हाळगी प्रबोधिनीने कार्यक्रम ज्ञान सहभागी संस्था या नात्याने दिल्लीच्या पुसा येथील भारतीय कृषी आणि संशोधन संस्थान येथे दि. ११ ऑक्टोबर २०१७ रोजी कार्यक्रम आयोजित केला होता.

**अन्य कार्यक्रम:**

| क्रमांक | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | उपस्थित संख्या |
|---|---|---|---|
| १ | ११-१२ एप्रिल २०१७ | चंदिगढ महानगर पालिकाः नगरसेवक मार्गदर्शन शिबिर | २५ |
| २ | ३० जुलै २०१७ | शिक्षक आणि मुख्याध्यापक यांचा क्षमता संवर्धन प्रशिक्षण वर्ग | ५० |
| ३ | २८-३० ऑगस्ट २०१७ | सुमित्रा, बीएसएफ अ‍ॅकॅडमी, टेकनपूर, ग्वाल्हेर, मध्यप्रदेश शिबिर | ३० |

१४.

# भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थान (IIDL)

# भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थान (IIDL)

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने या अहवाल वर्षात नेतृत्व, राजकारण आणि सुशासन या त्रिसूत्रीवर आधारित एक वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थान (IIDL) या संस्थेच्या माध्यमातून सुरू करण्यात आला आहे. राजकारणातील नेतृत्व, सुशासन आणि सार्वजनिक क्षेत्रात सध्या योग्य आणि कुशल, अभ्यासू व कार्यक्षम मनुष्यबळाची आवश्यकता हे मुद्दे लक्षात घेऊन नेतृत्व, राजकारण आणि सुशासन या विषयांवर आधारित या नऊ महिन्यांच्या निवासी अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.

### अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

नेतृत्व, राजकारण आणि सुशासन यांवर आधारित आय. आय. डी. एल.चा हा आगळावेगळा पदव्युत्तर अभ्यासक्रम भारतातील विचारशील तरुण आणि भारताची लोकशाही मूल्ये आणि सुशासन यांच्यातील दुवा ठरला आहे. राजकारण, सुशासन आणि सार्वजनिक क्षेत्र यांमध्ये नेतृत्व करू इच्छिणारे तरुण विद्यार्थी आणि तरुण व्यावसायिक यांना केंद्रभूत मानून या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमातील वर्गात होणाऱ्या व्याख्यानांना शिक्षणतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ, धोरण निर्माते, निवडून आलेले लोकप्रतिनिधी, राजकारणी, प्रशासक, पत्रकार, कार्यकर्ते यांचे मार्गदर्शन लाभते. त्यामुळे प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांकडून विषय समजणे व अभ्यासणे विद्यार्थ्यांना सोपे जाते. व्याख्यानांच्या जोडीने क्षेत्र भेटी आणि अभ्यास दौरे यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना फिल्डचा अनुभव देण्यावर भर देण्यात आला आहे. अभ्यासक्रमाच्या अखेरीस एक महिन्याच्या इंटर्नशीपचा अंतर्भाव या पदव्युत्तर अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

### अपेक्षित सहभागी

पत्रकारिता, राजकारण, प्रशासकीय सुशासन, सामाजिक क्षेत्र आणि सामाजिक संस्था यांमध्ये करिअर करू इच्छिणारे विद्यार्थी आणि तरुण व्यावसायिक या भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थान (IIDL) संस्थेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात सहभागी होऊ शकतात.

### पहिली तुकडी

भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थान (IIDL) संस्थेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची पहिली तुकडी या अहवाल वर्षातील दि. ९ ऑगस्ट २०१७ रोजी सुरू झाली. यात भारतातील १४ राज्यांतून विविध स्तरांतील एकूण ३२ विद्यार्थी सहभागी झाले होते. या पहिल्या तुकडीच्या प्रेरणा समारंभाला रिपब्लिक टीव्हीचे प्रमुख संपादक अर्णब गोस्वामी, संगीत नाटक अकादमीचे अध्यक्ष शेखर सेन आणि प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खा. विनय सहस्रबुद्धे उपस्थित होते. भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थान (IIDL) संस्थेचे डीन रवींद्र साठे यांनी या अभ्यासक्रमासाठी खास तयार करण्यात आलेली शपथ विद्यार्थ्यांना दिली. या प्रसंगी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य श्रीमती रेखा महाजन आणि अरविंद रेगे उपस्थित होते.

भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थान (IIDL) संस्थेच्या वर्षभर चाललेल्या या अभ्यासक्रमात राजकारण, सुशासन आणि सामाजिक क्षेत्र यांतील अनेक मान्यवर अभ्यासक आणि विषय तज्ज्ञ यांची व्याख्याने झाली. तसेच अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले त्यात प्रामुख्याने भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा, माजी उपपंतप्रधान लालकृष्ण आडवाणी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, स्मृती इराणी, महेश शर्मा, जितेंद्र सिंग, काँग्रेस नेते जयराम रमेश, जनता दल (युनायटेड) पक्षाचे राज्यसभा खासदार हरिवंश नारायण सिंग, भाजपाचे गोपाळ शेट्टी, मीनाक्षी लेखी, पूनम महाजन, अमर साबळे, इस्रायल वकीलातीचे मुंबईतील उपउच्चायुक्त निमरोद असौलिन, लेखक राधाकृष्णन पिल्लई, जनमत चाचणी तज्ज्ञ जय मृग, राष्ट्रीय संशोधन प्राध्यापक डॉ. अशोक मोडक, शैलेश गांधी यांचा समावेश होता.

या अभ्यासक्रमात व्याख्यानांच्या जोडीला प्रत्यक्ष क्षेत्रात काम केल्याचा अनुभव घेण्याच्या दृष्टीने मीरा-भाईंदर महानगर पालिकेची निवडणूक, गुजरात विधानसभा निवडणूक, मुंबई उच्च न्यायालय, रायगड किल्ला, धारावी झोपडपट्टी, वनवासी क्षेत्र जव्हार (पालघर), आदर्श ग्राम योजनेतील हिवरे बाजार, पुंसारी (अहमदनगर), अमेरिकी वकीलातीतील उच्चायुक्तांचे कार्यालय, संसद, नॉर्थ ब्लॉक, राष्ट्रपती भवन या ठिकाणांना भेटी देण्यात आल्या. आय.आय.डी.एल.मध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा या हेतूने मॉडेल पार्लमेंट आणि मॉडेल युनायटेड नेशन्स ही दोन प्रात्यक्षिके घेण्यात आली. कर्नाटक निवडणुकीतील वॉर रूममध्ये, छत्तीसगडमधील कुरूद विधानसभा क्षेत्रात, नवी दिल्लीच्या पब्लिक पॉलिसी रिसर्च सेंटरमध्ये, खा. विनय सहस्रबुद्धे यांच्या कार्यालयात, भारतीय जनता युवा मोर्चा-गुजरात या ठिकाणी विद्यार्थ्यांना काम करण्याची संधी इंटर्नशीपच्या दरम्यान मिळाली आहे.

### आय.आय.डी.एल.वर एक संख्यात्मक दृष्टिक्षेप

| | |
|---|---|
| एकूण व्याख्याने | ४२४ |
| एकूण विशेष मार्गदर्शने | १८२ |
| क्षेत्र भेटी | १८ |
| आठवड्याचे अभ्यास दौरे | ०२ |
| चित्रपट समीक्षण | ०९ |

## प्रबोधिनीच्या महासंचालकपदी रवींद्र साठे यांची नियुक्ती

डॉ. विनय सहस्रबुध्दे यांची २०१६ मध्ये राज्यसभेवर खासदार म्हणून निवड झाल्यामुळे त्यांनी प्रबोधिनीत त्यांच्याकडे असलेल्या महासंचालकपदाचा राजीनामा दिला होता. तेव्हापासून हे पद रिक्त होते. दि. ३१ मार्च २०१८ रोजी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीची बैठक झाली. या बैठकीत संस्थेचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांनी या पदावर रवींद्र साठे यांची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला. सभेने या प्रस्तावाचे स्वागत केले व रवींद्र साठे यांची महासंचालक म्हणून नियुक्ती करण्याचा ठराव सर्वानुमते संमत झाला.

# १५. इन्स्टिट्यूट ऑफ इनक्ल्युझिव्ह गव्हर्नन्स, हैदराबाद (IIGH)

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण, प्रबोधन आणि संशोधन या आपल्या त्रिसूत्रीचा कार्यक्रम विविध राज्यांमध्ये राबविण्याचे लक्ष्य ठेवून मागील अहवाल वर्षात रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने आंध्र प्रदेशमध्ये इन्स्टिट्यूट ऑफ इनक्ल्युझिव्ह गव्हर्नन्स, हैदराबाद ही संस्था दि. २५ डिसेंबर २०१७ पासून कार्यान्वित केली आहे. भाजपाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते या नव्या संस्थेचे उद्घाटन करण्यात आले.

समाजाच्या सर्व घटकांचा उत्कर्ष आणि राष्ट्रीयत्वाची भावना अशा संस्थात्मक कार्यातून होत असते. माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय प्रमोद महाजनांच्या मार्गदर्शनाखाली आकाराला आलेल्या म्हाळगी प्रबोधिनीचे मनुष्यबळ विकासाचे हे कार्य योग्य दिशेने चालणार यात शंका नाही असा विश्वास विनय सहस्त्रबुद्धे यांनी या वेळी व्यक्त केला. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या प्रेरणेने हैदराबाद शहराच्या उपनगरात सुरू करण्यात आलेल्या या इन्स्टिट्यूट ऑफ इन्क्ल्युझिव्ह गव्हर्नन्स, हैदराबाद या केंद्राने नेतृत्व आणि व्यवस्थापन या क्षेत्रांत विशेष लक्ष द्यावे. त्यामुळे समाजातील गरजू घटकांना व विद्यार्थीदशेतील तरुणांना या क्षमता विकास कार्यक्रमाचा उपयोग होऊ शकेल असे म्हाळगी प्रबोधिनीचे तत्कालीन कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले. ते पुढे म्हणाले की, समाज प्रबोधनाच्या क्षेत्रात ३६० अंशाने विचार करून नवीन प्रशिक्षक घडवणे हेदेखील तितकेच गरजेचे आहे. शिवाय समाजातील समस्यांच्या गरजांचे संशोधन करणे आणि गरजूंचे कौशल्य विकसित करणे ही काळाची गरज आहे.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हैदराबाद प्रांताचे संघचालक पी. व्यंकटेश्वर राव, भाजपाचे आंध्र प्रदेशचे प्रदेश अध्यक्ष के. लक्ष्मण, प्रदेश सरचिटणीस मंत्री श्रीनिवास, विधान परिषद सदस्य एन. रामचंदर राव, एन.सी.इ.आर.टी. सदस्य पी. मुरली मनोहर, डॉ. के बालाराजू आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

# काही प्रतिक्रिया

“ हे संकुल प्रशिक्षणासाठी, विचार मंथनासाठी, एकाकी परिषदांसाठी अतिशय उत्कृष्ट ठिकाण आहे. शहरालगत सहज पोहोचता येईल असे आहे. इथली निवास आणि भोजन व्यवस्था आणि इथल्या सभागृह सुविधा खूप चांगल्या आहेत. माझी टीम आणि मी स्वतः खूप समाधानी आहोत.

**– विनायक गोखले,**
**सहकारी संचालक, विक्री प्रशिक्षण आणि विकास**
**अँबट इंडिया लिमिटेड.**

“ आम्ही या संकुलात दोन दिवसांचे प्रशिक्षण आयोजित केले होते. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीतील वेळेचे नियोजन आणि सेवा व्यवस्था, स्वच्छता या बाबींकरिता मी त्यांचे अभिनंदन करतो. इथे प्रशिक्षणासाठी जे वातावरण निर्माण केले आहे ते अद्वितीय आहे. इथल्या सेवा, इथले बदलास अनुरूप धोरण आणि मुंबईपासून जवळ असल्यामुळे मला पुन्हा येथे यायला आनंद होईल.

**– महेंद्र गारोडिया,**
**प्रशिक्षक आणि सदस्य,**
**मुंबई चार्टर्ड अकाउंटन्ट सोसायटी**

“ आम्ही आखलेल्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात कोणत्याही अडचणी येणार नाहीत याची काळजी घेत आम्हांला जे सहकार्य मिळाले त्याबद्दल प्रबोधिनीच्या सगळ्या टीमला मी धन्यवाद देते. असेच सहकार्य आम्हाला यापुढेही मिळत राहील अशी आशा व्यक्त करते.

**– शिल्पी प्रसाद,**
**सहव्यवस्थापक, मनुष्यबळ विकास विभाग,**
**बजाज इलेक्ट्रिकल्स लि.**

# आमची उपलब्ध प्रकाशने

| प्रकाशनाचे नाव | लेखक | किंमत रु. |
|---|---|---|
| संघटनशास्त्र (पाचवी आवृत्ती) | संपादन: डॉ. विनय सहस्रबुध्दे | १००.०० |
| बाळासाहेब देवरस : कर्तृत्व आणि विचार | भैयाजी जोशी | २५.०० |
| समीक्षा संचित (निवडक इंग्रजी ग्रंथांच्या परीक्षणांचे संकलन) | लेखक : ज.द.जोगळेकर, संपादन : रवींद्र साठे | ३००.०० |
| डाव्यांची ढोंगबाजी : भ्रष्टाचार,हिंसाचार,आणि दंडुकेशाही | माधव भांडारी | ७५.०० |
| आयसिसचा उद्रेक आणि त्याचे महाराष्ट्रावरील परिणाम | मधुबन पिंगळे | ६०.०० |
| लोकनीतीचे उपासक : लोकनायक जयप्रकाश | मिलिंद बोकील | २०.०० |
| छत्तीसगढमधील अंतर्गत सुरक्षितता आणि विकास | - - - | २५.०० |
| संगठन कौशल (द्वितीय आवृत्ती) | हिंदी रुपांतर : प्रकाश भातम्ब्रेकर | १५०.०० |
| राजनीति के उस पार (चतुर्थ संस्करण) | संपादन : सुधीर नांदगांवकर | १५०.०० |
| भारतीय जनता पार्टी राजकारणात कशासाठी ? (आवृती : मराठी / हिंदी / इंग्रजी ) | अमित शाह | २५.०० |
| Left Front Rule in West Bengal : Genesis, Growth and Decay | Dr. Ashok Modak, Atul Bhatkhalkar | 40.00 |
| AL-Qaeda (Global Terror Incorporated) | Sudhakar Raje | 50.00 |
| War on Terrorism (A compilation of seminar papers) | Edited : Ravindra Sathe, Milind Arolkar | 30.00 |
| Creativity in Cooperation (Four Success Stories) | Nirajan Welankar, Ravi Pokharna | 40.00 |
| Understanding Human Computer : System & Software | Arvind Bhaskar Rege | 120.00 |
| Politics and Governance In Tripura (1977-2015) : A Critique | Dr. Ashok Modak, Devendra Pai | 100.00 |

# रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
# कर्मचारी वृंद

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | रवींद्र साठे | महासंचालक |
| २. | उमेश मोरे | निवासी मुख्य व्यवस्थापक (परिसर देखभाल) |
| ३. | रवी पोखरणा | कार्यकारी प्रमुख - प्रशासन आणि प्रकल्प |
| ४. | सुनिल जंगम | कार्यालय अधीक्षक |
| ५. | आनंद शिधये | प्रशासकीय अधिकारी |
| ६. | महेश सावंत | लेखाधिकारी |
| ७. | हेमंत देवधर | वरिष्ठ अभ्यागत संपर्क अधिकारी |
| ८. | मिलिंद चाळके | वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी |
| ९. | दिलीप नवेले | ग्रंथपाल |
| १०. | देवेंद्र पै | मुख्य कार्यकारी-शैक्षणिक कार्यक्रम |
| ११. | चंद्रकांत जाधव | निवासी संकुलसेवा अधिकारी |
| १२. | दिपक मांगले | देखभाल अधिकारी |
| १३. | गजानन सातुर्डेकर | साहाय्यक अधिकारी (भांडार) |
| १४. | प्रभाकर नानल | साहाय्यक अधिकारी ( आहारसेवा) |
| १५. | सागर पाटील | लेखा साहाय्यक |
| १६. | जिवबा चव्हाण | कार्यालय समन्वयक |
| १७. | जयवंत शेलार | साहाय्यक अधिकारी -तांत्रिक देखभाल |
| १८. | भीमराव पांचाळ | कार्यक्रम समन्वयक |
| १९. | संजय महाडिक | विपणन अधिकारी |
| २०. | अजय गोरिवले | निवासी अभ्यागत सेवा समन्वयक |
| २१. | शुभांगी मोरे | दूरध्वनी परिचालिका |
| २२. | मुन्ना मिश्रा | निवासी साहाय्यक अधिकारी - तांत्रिक देखभाल |
| २३. | मुकेश पाटील | आहार सेवा साहाय्यक |
| २४. | अमर लोहार | निवासी वातानुकूलित यंत्रणा चालक |
| २५. | चित्तेश पांडे | कार्यकारी साहाय्यक |
| २६. | मनिष वखारिया | कार्यालय साहाय्यक |

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| २७. | रितेश घोगले | कार्यालय साहाय्यक |
| २८. | अविनाश डोळस | कार्यालय साहाय्यक |
| २९. | मानसिंग वसावे | कार्यालय साहाय्यक |
| ३०. | दिलीप वळवी | कार्यालय साहाय्यक |
| ३१. | नेहरु वळवी | साहाय्यक तांत्रिक देखभाल |
| ३२. | जालिंदर साबळे | वाहन चालक |
| ३३. | विनोद पाटील | वाहन चालक |
| ३४. | सचिन म्हाबदी | निवासी वाहन चालक व विशेष साहाय्यक |
| ३५. | रामदास गावित | निवासी वाहन चालक |
| ३६. | पुष्पकांत पाटील | कार्यालय साहाय्यक |
| ३७. | आशिष पाटील | कार्यालय साहाय्यक |
| ३८. | सचिन तायडे | कार्यालय साहाय्यक |
| ३९. | मिलिंद बेटावदकर | वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी (मुंबई कार्यालय) |
| ४०. | दिपक ठाकरे | कार्यालय समन्वयक (मुंबई कार्यालय) |
| ४१. | मारुती वाघमारे | कार्यालय साहाय्यक (मुंबई कार्यालय) |
| ४२. | राहूल टोकेकर | कार्यालय अधीक्षक (पुणे कार्यालय) |
| ४३. | वैभव गोडसे | कार्यक्रम समन्वयक (पुणे कार्यालय) |
| ४४. | मनिषा दायमे | कार्यालय साहाय्यक (पुणे कार्यालय) |
| ४५. | प्रशांत बर्थवाल | वरिष्ठ संशोधन सहकारी (दिल्ली कार्यालय) |
| ४६. | प्रशांत चौहान | प्रकल्प अधिकारी (दिल्ली कार्यालय) |
| ४७. | ध्रुव दुबे | संशोधन सहकारी (दिल्ली कार्यालय) |
| ४८. | पंकज सिंह लार्ड | कार्यालय साहाय्यक (दिल्ली कार्यालय) |

# व्यवस्थापन समिती

| | |
|---|---|
| प्रा. अनिरुद्ध देशपांडे | अध्यक्ष |
| डॉ. विनय सहस्रबुद्धे | उपाध्यक्ष |
| मंगल प्रभात लोढा | सचिव |
| प्रताप(भाई) आशर | कोषाध्यक्ष |
| अनुप अग्रवाला | सदस्य |
| विजय(भाई) गिरकर | सदस्य |
| रेखा महाजन | सदस्य |
| अरविंद रेगे | सदस्य |
| व्ही. सतीश | सदस्य |
| रवींद्र साठे | महासंचालक |

# कार्यकारी समिती

| | |
|---|---|
| अशोक मुखर्जी : | भारताचे संयुक्त राष्ट्रसंघातील कायम प्रतिनिधी (निवृत्त) |
| धनंजय सिंह : | महासंचालक, एन.एच.आर.डी.एन. - दिल्ली |
| जय मृग : | निवडणूक विश्लेषक - मुंबई |
| जे.एस. माथुर : | माजी सचिव, पंचायत राज विभाग - भारत सरकार |
| जॉय बांदेकर : | कॉर्पोरेट अध्यक्ष - ओला |
| मंत्री श्रीनिवासन : | सामाजिक कार्यकर्ते - हैदराबाद |
| पोपटराव पवार : | कार्यकारी संचालक - आदर्श ग्राम योजना, महाराष्ट्र राज्य |
| प्रज्ञेश पोदार : | तरुण उद्योजक - मुंबई |
| प्रियांक कानूनगो : | सदस्य, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग - दिल्ली |
| डॉ. रामस्वामी बालसुब्रमण्यम् : | संस्थापक, स्वामी विवेकानंद यूथ मूव्हमेंट - म्हैसूर |
| सय्यद जाफर इस्लाम : | माजी कार्यकारी संचालक, डॉईश बँक आणि अर्थतज्ज्ञ, दिल्ली |
| विष्णु मित्तल : | सामाजिक कार्यकर्ते - दिल्ली |

# Rambhau Mhalgi Prabodhini

Society Registration Act (Registration No. 618 Bom. /82)
Trust Act (Registration No. F-7863 Bom./82
80-G Certificate No. DIT (E)/ITO(Tech)/80-G/1450/2009-10 (Valid from 01.04.2010)
• **FCRA No.** 083780667 • **PAN No.** AAATR3174J
• **TAN No.** MUMR16886C • **GSTIN No.** 27AAATR3174J1ZA

**मुंबई कार्यालय**

१७, चंचल स्मृती, गं. द. आंबेकर मार्ग, श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट समोर,
वडाळा, मुंबई-४०००३१. महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी क्र. +९१-२२-२४१३ ६९६६ / २४१८ ५५०२,
फॅक्स क्र. +९१-२२-२४१५ ६७२५
**Email :** samparka@rmponweb.org / **website :** www.rmponweb.org

**ज्ञान–नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण संकुल)**

केशव सृष्टी, उत्तन, एस्सेल वर्ल्ड रोड, भाईंदर (पश्चिम),
ठाणे - ४०११०६, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी क्र. +९१-२२-२८४५ ०१०१/२/३,
फॅक्स क्र. +९१-२२-२८४५ ०१०६
**Email :** guestrelations@rmponweb.org

**पुणे कार्यालय**

६२६, नारायण पेठ, लोखंडे तालीम शेजारी,
पुणे -४११०३०, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी क्र. +९१-२०-२४४७ ३२७१,
फॅक्स क्र. +९१-२०-२४४६ ५०१२
**Email :** cibls@rmponweb.org

**दिल्ली कार्यालय**

१३६, नॉर्थ एव्हेन्यू, नवी दिल्ली - ११०००१.
दूरध्वनी क्र. +९१-११-२३०९ २०३२
**Email :** rmpdelhioffice@rmponweb.org



भारताचे विद्यमान राष्ट्रपती रामनाथ कोविंद व सविता कोविंद यांच्या समवेत आय. आय. डी. एल. चे विद्यार्थी, सोबत राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री शिव प्रताप शुक्ला.




इन्स्टिट्यूट ऑफ इन्क्लुसिव्ह गर्व्हनन्स, हैदराबाद या विभागाच्या उद्घाटन प्रसंगी बोलतांना प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे सोबत मुरलीजी व डॉ.के.बालराजू.




ट्रान्सफॉर्मिंग नॉर्थ ईस्ट इंडिया या परिसंवादात बोलतांना मेरी कोम.




ट्रान्सफॉर्मिंग नॉर्थ ईस्ट इंडिया डायलॉग या परिसंवादात बोलतांना केंद्रीय संरक्षणमंत्री निर्मला सीतारामन सोबत नेहरु म्युझियम मेमोरियल लायब्ररीचे शक्ती सिंन्हा.

## मलपृष्ठ

**छायाचित्र क्र. १**
"ज्ञान नैपुण्य केंद्रात" एका व्यावसायिक संस्थेच्या प्रशिक्षणातील सहभागी

**छायाचित्र क्र. २**
इंटरनॅशनल कॉन्फरन्स फॉर एल्डर्स मध्ये सहभागी झालेले विविध देशांचे प्रतिनिधी

**छायाचित्र क्र. ३**
आर.एम.पी. इंटरनॅशनल आणि इंडो-इस्त्रायल यांच्या संयुक्त विद्यमाने जेवी रेफ्युजीस फ्रॉम अरब कंट्रीज या विषयावर बोलतांना इस्त्रायल परराष्ट्र मंत्रालयाचे वरिष्ठ राजदूत (निवृत्त) इवी गाबे, शक्ती मुन्शी, इस्त्रायलचे मुंबईतील महावाणिज्यदूत याकोवो फिंकलष्टाइन आणि महेश तेजवानी.





## रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
### मुंबई कार्यालय

१७, चंचल स्मृती, गं. द. आंबेकर मार्ग,
श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट समोर,
वडाळा, मुंबई-४०००३१.
महाराष्ट्र, भारत.


रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini
आत्मदीपो भव!

www.rmponweb.org Follow us on